
माजी पंतप्रधान भारतरत्न
राजीव गांधी यांना
जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.



# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ‣ संचालक-संपादक : अजय बिवडे



Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075



Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, २० ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २५१ | किंमत : २ रूपये



सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# आम्हाला मिळत नसेल तर 'शिवसेना पक्ष आणि चिन्ह' गोठवा

## उद्धव ठाकरेंचे वकील कपिल सिब्बलांची न्यायालयात महत्त्वाची मागणी

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

देशाचे लक्ष लागलेल्या शिवसेना पक्ष आणि चिन्हासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी अंतिम टप्प्यात आली आहे. ठाकरेंच्या शिवसेना पक्षाच्यावतीने वकील कपिल सिब्बल प्रभावी बाजू मांडत आहेत. आत्तापर्यंत शिवसेना पक्ष आणि चिन्ह हे उद्धव ठाकरेंनाच दिले पाहिजे, अशी मागणी सिब्बल न्यायालयात करत होते. मात्र, पहिल्यांदाच कपिल सिब्बल यांनी शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह गोठवण्याची मागणी केली आहे. त्यामुळे, राजकीय वर्तुळातील अनेकांच्या भुवया उंचावल्या असून न्यायालयाच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




कपिल सिब्बल यांनी यापूर्वीही आपले मुद्दे प्रभावीपणे सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर मांडले असून विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष वेगवेगळा असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला होता. त्यामुळे, शिवसेना पक्ष आणि चिन्ह आपल्यालाच मिळेल, असा विश्वास शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी अनेकदा व्यक्त केला आहे. तर, एकतर शिवसेना पक्ष आणि चिन्ह आपल्याला मिळेल किंवा ते गोठवलं जाईल, असेही उद्धव ठाकरेंनी म्हटले होते. आता, ठाकरेंचे वकिल कपिल सिब्बल यांनी मोठी मागणी करत चिन्ह आणि पक्षाचे नाव गोठवण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे.

**तर पक्ष आणि चिन्ह गोठवावे - सिब्बल**

माझा विचारपूर्वक मांडलेला युक्तिवाद असा आहे आणि मी माननीय न्यायालयाला विनंती करतो की, 'शिवसेना' हे नाव ठाकरे यांचेच आहे आणि शिंदे गटाला ते चिन्ह मिळू शकत नाही, असा निर्णय द्यावा. त्यांनी त्या चिन्हाचा लाभ घेतला आहे, याचा अर्थ त्यांच्या बाजूने कोणताही न्याय्य हक्क निर्माण होत नाही. हा चिन्हाचा

### न्यायमूर्ती बागचे यांचे कामत यांना अनेक प्रश्न

आम्ही आज शिंदेंना अपात्र घोषित करू शकतो का, आम्ही विधानसभा अध्यक्षांची भूमिका घेऊन शिंदेंना अपात्र ठरवू शकतो का, असा प्रश्न न्यायमूर्ती बागची यांनी विचारला. आम्ही शिस्तभंगाच्या कारवाईची शिक्षा रद्द करु शकतो. पण शिक्षा देऊ शकतो का, असा प्रश्नही न्या. बागची यांनी विचारला. अध्यक्षांची भूमिका ही कायद्याच्या विरोधात असेल तर आम्ही ती रद्द करु शकतो. यात आम्हाला शंका नाही. पण परिणामी आम्ही त्यांना अपात्र करू शकतो का, असे न्यायमूर्ती बागची यांनी कामत यांना विचारले.

अनधिकृत वापर करण्याचा प्रकार आहे. जर ते चिन्ह त्यांना मिळू शकत नसेल आणि मलाही मिळू शकत नसेल, तर ते चिन्ह गोठवले गेले पाहिजे. कारण, ते नाव माझा हक्क आहे, अशा शब्दात कपिल सिब्बल यांनी शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत पहिल्यांदाच मोठी मागणी केली आहे.

**सुप्रीम कोर्टातील युक्तिवाद**

वरिष्ठ वकील कपिल सिबलः ज्या अथार्चा अन्वयार्थ लावल्याने या गोष्टीला परवानगी मिळेल, तो अन्वयार्थ 'दहाव्या अनुसूची'चे उल्लंघन करणारा ठरेल. केवळ परिच्छेद ३ आणि ४ मध्ये नमूद केलेले बचावच यासाठी उपलब्ध आहेत. 'दहाव्या अनुसूची'चा अर्थ लावताना, पक्षांतराला प्रोत्साहन देऊन आपल्या लोकशाही प्रक्रियेचा पायाच उद्धवस्त होणार नाही, याची आपण खात्री केली पाहिजे.

जर तुम्ही असे म्हणत असाल की १९ जुलै नंतर त्यांना इतका पाठिंबा मिळाला आणि म्हणून त्या नंतरच्या पाठिंब्यावर अवलंबून राहता येईल, तर तुम्ही पक्षांतरालाच प्रोत्साहन देत आहात. जेव्हा एखादी व्यक्ती सत्तेवर असते, तेव्हा असे घडणे स्वाभाविकच असते.

२१ जून आणि १९ जुलै रोजी परिस्थिती जशी होती, त्याच घटनांचा विचार करणे आवश्यक आहे. त्यानंतर घडलेल्या कोणत्याही गोष्टीचा वापर अशा प्रकारे केला जाऊ शकत नाही ज्यामुळे पक्षांतराला प्रोत्साहन मिळेल. 'दहाव्या अनुसूची'च्या अथार्चा हाच मुख्य गाभा आहे. माझा विचारपूर्वक मांडलेला युक्तिवाद असा आहे आणि मी माननीय न्यायालयाला विनंती करतो की, 'शिवसेना' हे नाव ठाकरे यांचेच आहे आणि शिंदे गटाला ते चिन्ह मिळू शकत नाही, असा निर्णय द्यावा. त्यांनी त्या चिन्हाचा लाभ घेतला आहे, याचा अर्थ त्यांच्या बाजूने कोणताही न्याय्य हक्क निर्माण होत नाही. हा चिन्हाचा अनधिकृत वापर करण्याचा प्रकार आहे.

जर ते चिन्ह त्यांना मिळू शकत नसेल आणि मलाही मिळू शकत नसेल, तर ते चिन्ह गोठवले गेले पाहिजे. ते नाव माझा हक्क आहे. हा माझा पर्यायी युक्तिवाद आहे.

ज्या लाभाचा उपभोग घेण्यास ते मुळात पात्रच नव्हते, असे आमच्या मते सिद्ध होते; त्याच लाभाच्या आधारे ते आता कोणताही न्याय्य हक्क सांगू शकत नाहीत.

## थोडक्यात

### आजपासूनपासून मराठी सक्ती

**मुंबई :** राज्यातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे किमान व्यावहारिक ज्ञान असणे अनिवार्य असून, या नियमाची अंमलबजावणी गुरुवार २० ऑगस्टपासून करण्यात येणार आहे. मराठीचे व्यावहारिक ज्ञान नसलेल्या चालकांना सुरुवातीला एक महिन्याची नोटीस देण्यात येईल. या कालावधीत मराठीचे ज्ञान प्राप्त न केल्यास त्यांचा बॅज तीन महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात येईल, असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बुधवारी दिला. त्यानंतरही मराठी शिकण्यास जाणीवपूर्वक नकार दिल्यास बॅज आणि परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यात १९८९ पासून असलेल्या नियमाच्या आधारे रिक्षा आणि टॅक्सी चालविण्यासाठी व्यावहारिक मराठीचे ज्ञान आवश्यक आहे. १२ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आलेल्या संबंधित कायदेशीर तरतुदीनुसार आता या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. मराठी शिकणार नाही, बोलणार नाही, अशा प्रकारची भूमिका घेणाऱ्या चालकांविरोधात कायद्याच्या चौकटीत कारवाई करणे हे परिवहन विभागाचे कर्तव्य आहे. अशा चालकांना आता कोणतीही अतिरिक्त मुदत न देता कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. आतापर्यंत सुमारे ९ लाख ६५ हजार रिक्षा-टॅक्सी परवाने आणि बॅज देण्यात आले आहेत. यापुढे नवीन परवाना आणि बॅज देताना चालकाला व्यावहारिक मराठीचे ज्ञान आहे की नाही, याची आरटीओ अधिकारी प्रत्यक्ष संवादाद्वारे तपासणी करेल आणि त्याचे व्हीडीओ रेकॉर्डिंग केले जाईल.

# उपोषण अंतरवालीतच, पण मुंबईलाही जाणार : मनोज जरांगे





**वृत्तसंस्था, पुणे**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन आक्रमक झाले आहेत. येत्या २९ ऑगस्टपासून ते पुन्हा एकदा उपोषणाला सुरुवात करणार आहेत. दरम्यान, ते उपोषण अंतरवाली सराटीत करणार की मंबईत करणार? असा सवाल उपस्थित केला जात होता. मात्र, अखेर मनोज जरांगे पाटील यांनीच याबाबतची सविस्तर माहिती दिली आहे. उपोषण अंतरवाली सराटीतच होणार असल्याची माहिती मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी दिली आहे. पण प्रश्न जर निकाली निघाला नाही तर उपोषण सुरु असतानाच मुंबईला निघणार असल्याचा थेट इशारा देखील त्यांनी दिला आहे.

दरम्यान, यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली. त्यांच्यामुळंच उपोषणाची वेळ आली असल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे. तर संजय सिरसाट यांचा आडमुठेपणा शिंदेंना नडणार असून दोघांची मिली भगत असल्याची शंका जरांगेंनी व्यक्त केली आहे. दरम्यान, उपोषण अंतरवाली सराटीत होणार असून, प्रश्न निकाली नाही लागला तर मुंबईत येणार असल्याचा इशारा देखील मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिला आहे.

**सिरसाट यांनी प्रमाणपत्र रद्द केल्याचा आरोप**

दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून मनोज जरांगे पाटील हे उपोषण मुंबईत करणार की अंतरवाली सराटीत करणार असा प्रश्न उपस्थित केला जात होता. अखेर मनोज जरांगे पाटील यांनीच उपोषण अंतरवाली सराटीत करणार असल्याची माहिती दिली आहे.

### सरकारला थेट इशारा

त्याचबरोबर सरकारला इशारा देखील दिला आहे.

उपोषण अंतरवाली सराटीतच होणार असल्याची माहिती खुद्द जरांगे यांनी दिली आहे. येत्या २९ ऑगस्टला मनोज जरांगे पुन्हा आमरण उपोषणला बसणार आहेत. मात्र हे आंदोलन मुंबई होणार की अंतरवाली सराटी याबाबत संभ्रम होता. मात्र आता मराठा समाजाचं आंदोलन अंतरवाली सराटीतच होणार असून प्रश्न निकाली निघाला नाही तर उपोषण सुरु असतानाच मुंबईला जाणार आहे. त्यासाठी परवानगी अर्ज केला असल्याचं जरांगे पाटील यांनी स्पष्ट केलं आहे. दरम्यान देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यामुळेच उपोषणाची वेळ आली आहे.

शिंदे यांच्या सांगण्यावरूनच बैठका घेण्यात आल्याचे जरांगे म्हणाले. एकनाथ शिंदे आणि संजय सिरसाट यांची मिलीभगत असून सिरसाट यांनी प्रमाणपत्र रद्द केल्याचा आरोपही जरांगे यांनी केला आहे.

# एमएमआरडीएच्या भरती प्रक्रियेची न्यायालयीन चौकशी करा : खा. सुप्रिया सुळे

**वृत्तसंस्था, मुंबई**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील (एमएमआरडीए) सहाय्यक अभियंता भरती प्रक्रियेत गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी असल्याने ही भरती प्रक्रिया रद्द करून यातील गैरप्रकाराची न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.



सरकारी स्पर्धा परीक्षेत उघड होत असलेल्या सततच्या गैरप्रकारांबद्दल सुळे यांनी मंगळवारी एक्स या समाज माध्यमातून चिंता व्यक्त केली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये परीक्षांमध्ये सातत्याने गैरप्रकार होत असल्याचे समोर आले आहे. आता एमएमआरडीए भरती प्रक्रियेतील गैरप्रकारांमुळे पुन्हा एकदा सरकारी परीक्षांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या परीक्षेत अनेक संशयास्पद बाबी समोर आल्याने त्यांची सखोल चौकशी होणे अतिशय गरजेचे आहे, असे सुळे यांनी म्हटले आहे.

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारी लाखो मुले, त्यांचे पालक आणि त्यांचे स्वप्न या सर्वांच्या कष्टांचे मोल सरकारने राखायला हवे. त्यामुळे एमएमआरडीएची भरती प्रक्रिया तातडीने रद्द करुन उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली या परीक्षेतील गैरप्रकाराची चौकशी करावी तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सुळे यांनी केली आहे. हा विषय फक्त एका परीक्षेचा नाही. तर मागील एक वर्षात मुंबई महापालिका, पुणे महापालिका, एमआयडीसी, सिडको, राज्य विद्युत पारेषण कंपनी अशा आठ ते नऊ परीक्षांमध्ये घोटाळे झाल्याचे समोर आले आहे.

विद्यार्थ्यांनी पुणे महापालिका परीक्षेमध्ये झालेल्या गैरप्रकाराबद्दल शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. मात्र, त्याचा तपास बंद करण्यात आल्याचे विद्यार्थांचे म्हणणे आहे. तसेच विद्युत पारेषण कंपनीच्या परीक्षेत काही संशयित विद्यार्थी आढळून आल्याने याबद्दल चौकशी होणे गरजेचे असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

# खापरखेडा गँगवार प्रकरण भोवले, पोलीस निरीक्षक हरिष रुमकर यांची बदली

## संदीप बुवा स्वीकारणार पदभार

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

मुख्य बाजारपेठेत २ ऑगस्टच्या रात्री घडलेल्या दगडी चाळ गँगवार व एमडी तस्करीच्या पार्श्वभूमीवर अखेर प्रशासकीय कुऱ्हाड कोसळली आहे खापरखेडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष लक्ष्मण रुमकर यांची उचलबांगडी करण्यात आली असून त्यांच्या जागी आर्थिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप विनायक बुवा नवीन पदभार स्वीकारणार आहेत.

यासंदर्भात नागपूर शहर पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी १९ ऑगस्ट बुधवारला आदेश जारी केले आहेत.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जनता दरबारात गँगवार व खापरखेडा परिसरात वाढत्या अवैध धंद्यांचे तीव्र पडसाद उमटले पालकमंत्र्यांनी शहर पोलीस आयुक्तांना गुन्हेगारांवर कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत शिवाय पोलीस आयुक्त कार्यालयात विशेष बैठक बोलावण्यात आली होती पालकमंत्री बावनकुळे स्वतः या आढावा बैठकीला उपस्थित होते.

२ ऑगस्ट रोजी खापरखेडा मुख्य बाजारपेठेत तलवार, चाकू आणि फावड्यांनी हिमांशू कडू,





रोहित मेश्राम व रक्षित कापसे यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता या गँगवारमध्ये तिघेही गंभीर जखमी झाले असून परिसरात दहशतीचे वातावरण आहे.

खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीत सुरू असलेले अवैध धंदे व एमडी सारख्या अंमली पदार्थांची विक्री होत असल्यामुळे गँगवार भडकल्याचा थेट आरोप स्थानिक नागरिकांनी केला होता यासंदर्भात विशेष ग्रामसभा घेण्यात आल्या होत्या.

अखेर नागपूर शहर पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष लक्ष्मण रुमकर यांच्या बदलीचे आदेश १९ ऑगस्ट बुधवारला काढले असून त्यांची आर्थिक गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे त्यांच्या जागेवर आर्थिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप विनायक बुवा यांची बदली करण्यात आली आहे.

# पुण्यात चिमुकलीची अत्याचारानंतर हत्या

**वृत्तसंस्था, पुणे**

जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडीत नराधमाने हे संतापजनक कृत्य केले. चिमुरडीला सायकल शिकवण्याचा बहाणा करुन हा नराधम मुलीला ऊसाच्या शेतात घेऊन गेला. मुलीचे आई-वडील शेतात मजुरीसाठी गेले होते. पीडित मुलगी कांजण्या आल्यामुळे शाळेत गेली नव्हती. ती एकटीच घरी असताना नराधमाने डाव साधला. त्यानंतर मुलीचे आई-वडील घरी आल्यावर त्यांनी मुलीची शोधाशोध सुरु केली तेव्हा हा नराधम गावात सर्वांदेखत फिरत पोलिसांना दिलेला गुंगारा देत राहिला. मात्र, दरम्यानच्या काळात काही गोष्टी समोर आल्याने या नराधमाचे बिंग फुटले.



या नराधमाने चिमुकलीच्या घरापासून दीड किलोमीटर अंतरावर सायकल उभी केली आणि पुढं तो घनदाट शेतीकडे गेला. हे ऊसाचं क्षेत्र आहे, इथं बाजूला नाला आहे. इथूनचं चिमुरडीला घेऊन तो पुढं गेला. ऊसाच्या क्षेत्रात १०० मीटर आत आला आणि नेमकं हे दुष्कृत्य त्याने कुठं केलं याचा शोध घेण्यात आला. घनदाट शेत, बाजूला ओढा, शेत मालकही आठवड्यातून याठिकाणी एकदा फिरकतात, या सर्वांचा त्याला अंदाज असावा. त्यामुळेच या निर्मनुष्य स्थळी तो चिमुरडीला घेऊन आला आणि त्याने तिच्यावर अत्याचार करुन तिला मारुन टाकले.

यानंतर पोलीस दुपारी साडेचारच्या सुमारास १६ ते १७ कर्मचारी पिंपळवंडीला आले. साडेचार वाजता पोलीस आले, त्यांनी गावात सगळीकडे शोधाशोध केली. त्यानंतर साडेपाच- पावणेसहाच्या सुमारास पोलिसांनी सीसीटीव्ही चेक करायला घेतले. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर या नराधमाचे बिंग फुटले. सीसीटीव्हीचं चित्रीकरण तपासलं जात असताना पोलिसांना पहिला क्लू मिळाला. गावात एका माणसाच्या घरी सीसीटीव्ही आहेत. पोलिसांनी तिकडे सीसीटीव्ही फुटेज तपासायला सुरुवात केली. कुठल्याही प्रकारचा गुन्हा केल्याचे भाव त्याच्या चेहऱ्यावर जाणवत नव्हते. हरवलेल्या चिमुरडीचा शोध पोलीस आणि ग्रामस्थ घेत होते, तेव्हा हा नराधम त्यांच्यासोबतच होता आणि तो तपासात दिशाभूल करण्याचा प्रयत्न करायचा. त्याच्या चेहऱ्यावर कोणताही पश्चाताप नव्हता. पुढं हाचं आरोपी निघाल्यावर सर्वांना धक्का बसला.

दैनिक सिंहवाणी वृत्त



संपादकीय लेखणीतून...

## राजीव गांधी

राजीव गांधींसारख्या तरुण नेत्याच्या दूरदृष्टीमुळेच देश संगणक युगात प्रवेश करू शकला आहे. संगणकाच्या क्षेत्रातील अभ्यास आणि संशोधनाच्या प्रयत्नांवर त्यांनी भर द्यायला सुरुवात केली तेव्हा लोकांनी बेरोजगारी वाढेल, असे सांगून त्यांच्यावर कडाडून टीका केली, परंतु आज देशाच्या प्रगतीत संगणकाची उपयुक्तता आणि भूमिका यावरून साहजिकच समजू शकते. राजीव गांधी त्यांच्या काळाच्या पुढे चालताना पूर्ण समजूतदारपणाने निर्णय घेत असत.भारत आज माहिती तंत्रज्ञानाची महासत्ता बनला असून यामध्ये संगणकाची भूमिका महत्त्वाची आहे. राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली देशाने आधुनिकीकरण आणि समृद्धीच्या नव्या युगात प्रवेश केला. राजीव गांधी यांचा जन्म २० ऑगस्ट १९४४ रोजी मुंबईत झाला. त्यांचे आजोबा जवाहरलाल नेहरू यांनी त्यांचे नाव 'राजीव गांधी' ठेवले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणारे वडील फिरोज गांधी, आई इंदिरा गांधी आणि आजोबा जवाहरलाल नेहरू यांचा संघर्ष पाहून कदाचित एके दिवशी राजीव गांधींनीही या लढ्यात उडी घेतली असती, पण सुदैवाने १५ ऑगस्ट १९४७ ला इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला स्वातंत्र्य मिळाले.

स्वातंत्र्यानंतर राजीव गांधी यांचे आजोबा जवाहरलाल नेहरू देशाचे पहिले पंतप्रधान झाल्यावर ते त्यांच्या आई आणि धाकटे भाऊ संजय गांधी यांच्यासह दिल्लीच्या तिनमूर्ती भवनात राहायला आले. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण येथील शिव निकेतन या शाळेत झाले. १९५४ मध्ये राजीव यांना पुढील शिक्षणासाठी डेहराडूनच्या वेल्हम स्कूलमध्ये पाठवण्यात आले.तेथून आय.एस.सी.ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते सिनियर केंब्रिज येथे उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तिथे ट्रिनिटी कॉलेजमधून मेकॅनिकल इंजिनिअरची पदवी मिळवली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते दिल्ली फ्लाइंग क्लबचे सदस्य झाले आणि पायलटिंगचे प्रशिक्षण घेतले. बे केंब्रिजमध्ये शिकत असताना, त्यांची आई इंदिरा गांधी १९६६ मध्ये भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान झाल्या. शिक्षण पूर्ण केल्यानंतर, पायलटच्या प्रशिक्षणादरम्यान १९६८ मध्ये त्यांचे विवाह इटलीच्या सोनिया माइनो यांच्याशी झाले. आजोबा, वडील आणि आईचे देशाच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान असूनही, राजीव यांना राजकारणात यायचे नव्हते, म्हणून पायलटिंगचे प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांनी १९७० मध्ये इंडियन एअरलाइन्समध्ये पायलट म्हणून काम करण्यास सुरुवात केली.

२३ जून १९८० रोजी त्यांचे धाकटे बंधू संजय गांधी यांच्या निधनानंतर त्यांना इच्छा नसतानाही घराण्याचा वारसा सांभाळण्यासाठी राजकारणात प्रवेश करावा लागला. जून १९८१ मध्ये ते अमेठीमधून खासदार म्हणून निवडून आले आणि अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीसही बनले. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांच्या आईची, तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्याच अंगरक्षकांकडून निर्घृण हत्या झाल्यानंतर, काळाची गरज पाहून शोकाकुल राजीव यांना जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीची सत्ता हाती घ्यावी लागली. ते आतापर्यंतचे सर्वात तरुण पंतप्रधान होते आणि त्यांना राजकारणाचा फारसा अनुभव नव्हता, त्यामुळे ते राजकारणात यशस्वी होऊ शकणार नाहीत, अशी भीती काहींना वाटत होती, पण ज्या कौशल्याने ते देश चालवत होते, ते त्यांना राजकारणात पाहायला मिळाले. आधुनिकीकरणाच्या नव्या युगात घेऊन गेल्याने त्याचे सर्व समीक्षक आश्चर्यचकित झाले.

डिसेंबर १९८४ मध्ये लोकसभेच्या निवडणुका झाल्या, तेव्हा राजीवजींच्या अद्भूत नेतृत्व क्षमतेमुळे काँग्रेसला ५४२ जागांपैकी ४११ जागांवर अभूतपूर्व विजय मिळाला. ३१ डिसेंबर १९८४ रोजी राजीव गांधी नवीन लोकसभेच्या सदस्यांचे नेते म्हणून पुन्हा देशाचे पंतप्रधान झाले. आपल्या कार्यकाळात त्यांनी भारतीय जनतेच्या हिताचे अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले, नवनवीन कार्यक्रम सुरू केले आणि जगाच्या आंतरराष्ट्रीय पटलावर भारताला अभूतपूर्व प्रतिष्ठा मिळवून दिली. श्रीलंकेत लिट्टे आणि सिंघलवादी यांच्यात सुरू असलेले युद्ध शमवण्यासाठी त्यांनी भारतीय सैन्य श्रीलंकेत तैनात केले. राजकीय अस्थिरता संपवण्यासाठी त्यांनी १९८५ मध्ये राजकीय पक्षांतर विधेयक मंजूर करून घेतले. बेरोजगारीची भीषण समस्या सोडवण्यासाठी सन १९८८ मध्ये सर्वसमावेशक कर्ज योजना सुरू करण्यात आली आणि १ एप्रिल १९८९ रोजी जवाहर रोजगार योजना सुरू करण्यात आली, ज्या अंतर्गत 'इंदिरा आवास योजना' आणि 'दस लाख कुआँ योजना' यासारखे अनेक कार्यक्रम सुरू करण्यात आले.

# हुंडाबळी एक भीषण वास्तव

लीलाधर दवंडे
कामठी (नागपूर)

माता पित्यांनी आपल्या मुलींना शिकवायचं, त्यांचं योग्य संगोपन करून तिच्या भविष्याची स्वप्ने रंगवत योग्य जोडीदार शोधून तिचं लग्न लावून द्यायचं. या विवाह सोहळ्यात पाण्यासारखा पैसा खर्च करायचा आणि इतकं सारं करूनही सासरच्या मंडळींनी त्या मुलींचा हुंड्यासाठी छळ करायचा... प्रसंगी जाळून टाकायचं... किती वेदनादायी चित्र वाटतं ना! परंतु, दुर्दैवाने हेच चित्र समाजात प्रचलित व्हायला लागले आहे, याची खंत वाटते आहे.

हल्ली उपवर मुला मुलींचे लग्न जुळविणे म्हणजे तारेवरची कसरत असली तरी लग्न झाल्यानंतर ते टिकवून ठेवणे म्हणजे त्याहूनही मोठी मेहनत असल्याचे चित्र गेल्या काही काळापासून समाजात दिसून यायला लागले आहे. एकतर मुलामुलींच्या आवडी निवडी मर्यादेच्या बाहेर वाढायला लागल्या आहेत आणि लग्न संस्कार म्हणून त्याचे महत्त्व कमी होऊन नुसता दिखाऊपण अधिक वाढल्याने दोन्ही कडील खर्च वाढलेला आहे. त्यातल्या त्यात लग्नातील अनावश्यक खर्चाचा सर्वात जास्त भर पडतो तो मुलीच्या पित्यावर. प्रसंगी कर्जबाजारी होऊन तो निभावूनही नेतो. मात्र, इतका अवाढव्य खर्च आपल्या मुलीच्या सुखासाठी केल्यावरही जर मुलीला सासरच्या मंडळींकडून सतत जाच होत असेल तर कुण्या वधू पित्याला सुखाची झोप लागेल?

आज मुलींचे संगोपन करण्यास सुद्धा कमी खर्च लागत नाही! तरी, लग्न जुळवतांना मुलाकडील मंडळी मुलाच्या संगोपनाचा खर्च वधू पित्याकडून वसूल करत असेल तर काय म्हणावे? बरं, मुलीच्या आनंदासाठी प्रसंगी वधूपिता भेट म्हणून रोखडसह कित्येक वस्तू सुद्धा लग्नात देत असतो. त्यानंतर आमरस, आषाढी, सातवा महिना, बाळंतपण, इतरांची लग्ने अशा विविध कार्याप्रसंगी लागणारा खर्च वेगळाच. कुणी आलं गेलं तेही निराळंच. तरीसुद्धा समाजात निव्वळ हुंड्यापोटी मुलींचा छळ होत असेल, तर आपण सुशिक्षित नसून हवशी झालो आहोत, असेच खेदाने म्हणावे लागते.

राज्यमंत्री पंकज भोयर यांनी नुकतीच विधानसभेत यासंदर्भात एक माहिती दिली. या माहितीनुसार राज्यात गेल्या पाच वर्षांत हुंडाबळी संदर्भात तब्बल ७९९ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. जे नोंदवले गेले नाहीत, ते वेगळेच. या गुन्ह्यात १८७७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. मात्र, तारीख पे तारीखच्या गदारोळात आणि पैशाच्या खेळात यातील किती आरोपींना शिक्षा होईल आणि किती मोकाट सुटतील हे सांगता येणारे नाही.

हुंडा देणे आणि घेणे दोन्ही कायद्याने गुन्हा असला तरी समाजात ही पद्धत इतकी रूढ झालेली आहे की, अनेक समाजात यावाचून लग्नच जुळत नाहीत. उत्तर भारतीयांत तर ही पद्धत बरीच वरचढ दिसून येते. एखाद्या मुलाला सरकारी नोकरी असली किंवा त्याहून मोठ्या हुद्द्याची नोकरी असेल तर समाजात हा प्रतिष्ठेचा मुद्दा ठरतो. मात्र, ज्यांच्या मुली कुलीन आहेत, सुशिक्षित आहेत आणि घरची परिस्थिती गरीब आहे. त्यांनी काय करायचे? मागे, "केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या माझ्या एका मित्राला तब्बल १२५ कोटी रुपयांच्या हुंड्याचा प्रस्ताव आला होता", असा धक्कादायक खुलासा माजी लष्करी अधिकारी एस पी एस ओबेरॉय यांनी केला



होता. यावरून हुंडा देणाऱ्यांत सुद्धा किती स्पर्धा आहे, हे दिसून येते. मात्र, याहून हुंड्यासाठी बळी ठरलेल्या मुलींची संख्या अधिक असून ही आपल्या समाजाला लागलेली घातक किड आहे.

बहुतांश कुटुंबांत मुली आहेत आणि प्रत्येकाला अशा प्रसंगांना सामोरे जावे लागले आहेच. तरी सुद्धा घरी आलेल्या सुनेला जर हुंड्यासाठी जाळून मारले जात असेल, तिचा अमानूष छळ केला जात असेल, तर माणूस आता माणूस राहिला नसून क्रूर झालेला आहे, असेच म्हणावे लागेल.

हिंगोली जिल्ह्यातील आंबा चौंढी येथील भावी न्यायाधीशाने मागितलेला १५ लाखांचा हुंडा, दुसरा माळा बांधण्यासाठी घरून १० लाख रुपये आणण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील हब्बू वस्ती देगाव नाका येथील प्रियंका कुणाल गायकवाड या विवाहितेचा झालेला छळ, घर बांधण्यासाठी माहेरून पाच लाख रुपये आणण्यासाठी राहुरी तालुक्यातील नांदगाव येथील साधना गणेश जाधव या विवाहितेला देण्यात आलेली प्रताडना, चारचाकी गाडी घेण्यासाठी माहेरून पैसे आणण्याचा तगादा लावल्यावर चिंताग्रस्त असणाऱ्या बीबी जवळील भुमराळा येथील रोहिणी प्रवीण मस्के या विवाहितेने जाच सहन न झाल्याने केलेली आत्महत्या, भोपाळ येथील त्विशा शर्मा प्रकरण, लखनौ येथील श्वेता सिंह प्रकरण, मलकापूर तालुक्यातील विवरा येथील सरिता धनराज पाटील आत्महत्या, अशी कितीतरी प्रकरणे आपल्या आसपास घडत असतात. तरी सुद्धा माणसाचं मन इतकं दगडासारखं कसं काय झालं असावं, असा प्रश्न पडायला लागतो.

आज हुंड्याच्या लालसेपोटी इतरांच्या मुलींचा छळ करत आहोत. उद्याला आपल्याही कुटुंबातील मुली दुसरीकडे नांदायला जातील. हे वास्तव लक्षात घेऊन इतरांच्या मुली ह्या आपल्याच मुली म्हणून त्यांच्याकडे बघितलं तर उद्या आपल्या उतारवयात त्याच आधार बनतील. निदान ही आशा मनात ठेवून सुशिक्षित होत असलेल्या समाजाने अवाढव्य आणि वधू पित्याला न पेलणारा हुंडा न मागता संस्कारित होणे गरजेचे आहे. दिवसेंदिवस फुगीर होत चाललेला हुंडाबळींचा आकडा आता खाली उतरायला हवा. समाजाचे भीषण वास्तव असलेली हुंडाबळी ही एक अमानूष प्रथा आहे आणि ती आतातरी समाजातून हद्दपार व्हायला हवी, यासाठी तरुणांनी पुढे येणे गरजेचे आहे.

- ८४१२८७७२२०

# विशाखापट्टणम विमानतळ: एका युगाचा अंत आणि कर्मचाऱ्यांचे भवितव्य

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

विशाखापट्टणमच्या जुन्या विमानतळावरून व्यावसायिक प्रवासी विमानांचे उड्डाण थांबणे हा केवळ एका धावपट्टीचा किंवा इमारतीचा निरोप नसून, संपूर्ण आंध्र प्रदेशच्या नागरी उड्डाण इतिहासातील एका सुवर्णयुगाचा शेवट आहे. १९५० च्या दशकात एका छोट्या हवाई पट्टीवरून सुरू झालेला हा प्रवास सात दशकांहून अधिक काळ अविरत सुरू राहिला. या विमानतळाने

विशाखापट्टणमला एका साध्या बंदर शहरापासून देशातील प्रमुख औद्योगिक आणि तंत्रज्ञान केंद्र बनताना पाहिले आहे. लाखो प्रवाशांचे स्वागत, हुदहुदसारख्या भीषण चक्रीवादळाच्या वेळी झालेले बचावकार्य, आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शहराला मिळालेली ओळख या सर्व ऐतिहासिक क्षणांचे हे विमानतळ मूक साक्षीदार राहिले आहे.

हे विमानतळ भारतीय नौदलाच्या सामरिक महत्त्वाच्या 'आयएनएस देगा' या नौदल हवाई तळावर कार्यरत होते. भारतीय विमानतळ प्राधिकरण येथे नागरी उड्डाणांचे व्यवस्थापन पाहत होते. संरक्षण दल आणि नागरी सेवा एकाच धावपट्टीवर चालणे हे या विमानतळाचे मोठे वैशिष्ट्य होते. परंतु काळाच्या ओघात विझागच्या आर्थिक विकासाला वेग आला, प्रवासी आणि मालवाहतुकीत प्रचंड वाढ झाली. नौदलाच्या सुरक्षेशी संबंधित कडक नियम, शहराच्या मध्यवर्ती भागात जागेची भासणारी तीव्र टंचाई आणि मोठ्या आंतरराष्ट्रीय विमानांसाठी धावपट्टी विस्तार मयार्दा यामुळे जुनी पायाभूत रचना अपुरी ठरू लागली. वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी शहराबाहेर विजयनगरम जिल्ह्यातील भोगापुरम येथे जागतिक दर्जाचे नवीन ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आणि सर्व व्यावसायिक उड्डाणे तिकडे स्थलांतरित करण्यात आली.

नवीन विमानतळामुळे विशाखापट्टणमची जागतिक कनेक्टिव्हिटी सुधारणार असली, तरी जुन्या विमानतळावरील नागरी सेवा बंद होणे हा क्षण अनेकांसाठी अत्यंत भावुक ठरला. प्रवाशांच्या अनेक पिढ्यांच्या आठवणी या परिसराशी जोडल्या गेल्या होत्या. हे विमानतळ पूर्णपणे नष्ट होणार नसून नौदलाच्या संरक्षण आणि सामरिक कार्यासाठी २४ तास सक्रिय राहील, तरीही प्रवाशांच्या गर्दीने गजबजलेले टर्मिनल आता कायमचे शांत झाले आहे. अंतिम नागरी उड्डाणाच्या वेळी विमानाला दिलेली पाण्याची सलामी आणि उपस्थित कर्मचाऱ्यांचे पाणावलेले डोळे एका समृद्ध पर्वाच्या समाप्तीची साक्ष देत होते.

या बदलाची दुसरी आणि सर्वात गंभीर बाजू म्हणजे तेथे काम करणाऱ्या शेकडो कर्मचाऱ्यांचे भवितव्य. विमानतळ बंद झाल्याने केवळ जागा बदलली नाही, तर वर्षानुवर्षे सेवा देणाऱ्या सुमारे दोनशेहून अधिक कंत्राटी कामगारांच्या रोजगारावर थेट गदा आली आहे. विमान कंपन्यांचे कायमस्वरूपी अधिकारी आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांची सोय इतर शहरांत किंवा नव्या प्रकल्पात होईल; परंतु ग्राऊंड हँडलिंग, बॅगेज लोडिंग, स्वच्छता, मेंटेनन्स, सुरक्षा, तसेच खाद्यपदार्थ आणि रिटेल आऊटलेट्समध्ये राबणाऱ्या स्थानिक कामगारांसमोर अचानक उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न उभा राहिला आहे.

शहरापासून सुमारे चाळीस ते पन्नास किलोमीटर दूर असलेल्या नवीन भोगापुरम विमानतळावर या अनुभवी आणि निष्ठावंत कामगारांना प्राधान्याने सामावून घेणे ही काळाची गरज आहे. नव्या आधुनिक तंत्रज्ञानानुसार त्यांना योग्य प्रशिक्षण देणे, स्थलांतर आणि वाहतुकीची योग्य सोय करणे हे प्रशासनाचे नैतिक कर्तव्य ठरते. आधुनिक पायाभूत सुविधा आणि आर्थिक प्रगती आवश्यक आहेच, परंतु ज्या हातांनी सात दशके विशाखापट्टणमच्या हवाई प्रवासाचा डोलारा सांभाळला, त्यांच्या आयुष्याची सुरक्षा करणे हेच या नव्या अध्यायाचे खरे आणि सर्वसमावेशक यश ठरेल.

- ९५६१५९४३०६

# गॉल कसोटीत भारताचा दमदार विजय

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक




भारतीय संघाने गॉल कसोटीत श्रीलंकेला १६५ धावांनी पराभूत करून दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. भारतीय संघाने पहिल्या डावात ४६२ धावा केल्या, ज्याच्या प्रत्युत्तरात श्रीलंकेचा संघ केवळ २८४ धावांवर सर्वबाद झाला. भारतीय संघ आपल्या दुसऱ्या डावात १९३ धावांवर सर्वबाद झाला, तर ३७२ धावांचे लक्ष्य गाठताना श्रीलंकेचा संघ केवळ २०६ धावांवर सर्वबाद झाला. या सामन्यात मानव सुथारने १० बळी घेतले. त्याने पहिल्या डावात ४ आणि दुसऱ्या डावात ६ बळी घेतले.

**दिनुशाची शानदार खेळी**

सोनल दिनुशाने दुसऱ्या डावात श्रीलंकेसाठी पुन्हा एकदा शानदार खेळी केली. दिनुशाने पहिल्या डावात शानदार शतक झळकावले होते आणि दुसऱ्या डावात ती ८४ धावांवर बाद झाली. तिच्या बाद होण्याने टीम इंडियाचा विजय जवळपास निश्चित झाला होता, आणि डावाच्या ७८ व्या षटकात मानव सुथारने लाहिरू कुमारला बाद करताच टीम इंडियाचा विजय निश्चित झाला.

या सामन्यात टीम इंडियासाठी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंबद्दल बोलायचे झाल्यास, राजस्थानच्या मानव सुथारने १० बळी घेतले, तर देवदत्त पडिक्कलने १६७ आणि ४४ धावांच्या खेळीच्या जोरावर सामन्यात एकूण २११ धावा केल्या. केएल राहुलने ११७, तर यष्टीरक्षक-फलंदाज रिषभ पंतने १०५ धावा केल्या. रवींद्र जडेजाने चार, तर प्रसिद्ध कृष्णाने तीन बळी घेतले. मोहम्मद सिराजने दोन, तर कुलदीप यादवने संपूर्ण सामन्यात केवळ एक बळी घेतला.

**टीम इंडियाच्या विजयाची टक्केवारी वाढली**

या विजयामुळे जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत भारतीय संघाच्या विजयाची टक्केवारी ५३.३३ पर्यंत वाढली आहे. आता १० सामन्यांमध्ये त्यांचे पाच विजय आणि चार पराभव झाले आहेत. श्रीलंकेच्या विजयाची टक्केवारी ३३.३३ पर्यंत घसरली आहे. जर भारतीय संघाने पुढचा सामना जिंकला, तर त्यांची विजयाची टक्केवारी ५७ पर्यंत वाढेल. मात्र, त्यांच्या स्थानांमध्ये कोणताही बदल होणार नाही. भारत पाचव्या स्थानावर कायम राहील, तर श्रीलंका सहाव्या स्थानावर घसरेल. मात्र, जर बांगलादेश ऑस्ट्रेलियाविरुद्धचा दुसरा सामना हरला, तर भारतीय संघ चौथ्या स्थानावर घसरेल. भारतीय संघाचे स्थान आता ऑस्ट्रेलिया आणि बांगलादेश यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यावर अवलंबून असेल.

गॉल कसोटीत, रिषभ पंतने दुसऱ्या डावात ६९ चेंडूंमध्ये आठ चौकार आणि दोन षटकारांसह ६६ धावांची धडाकेबाज खेळी केली. या दोन षटकारांसह त्याने एक विश्वविक्रम प्रस्थापित केला आणि कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात जलद १०० षटकार मारण्याचा ॲडम गिलक्रिस्टचा विक्रम मोडला. गिलक्रिस्टने हा पराक्रम १३० डावांमध्ये केला होता, तर पंतने तो केवळ ८९ डावांमध्ये पूर्ण केला.

हा विश्वविक्रम मोडल्यानंतर, ऋषभ पंतने आणखी एक मोठी कामगिरी करत वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये भारतासाठी शुभमन गिलचे वर्चस्व संपुष्टात आणले. शुभमन गिल हा वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या इतिहासात भारताचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता. त्याने २१ कसोटी सामन्यांमध्ये ४२ च्या सरासरीने २,८६७ धावा केल्या आहेत.

आपल्या ६६ धावांच्या खेळीसह, रिषभ पंतने शुभमन गिलला मागे टाकले असून तो आता वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये भारताचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला आहे. त्याने ४१ सामन्यांमधील ७३ डावांमध्ये २,८८५ धावा केल्या आहेत. या काळात त्याचा स्ट्राइक रेट ७४ आणि सरासरी सुमारे ४२ राहिली आहे. पंतच्या नावावर ६ शतके आणि १७ अर्धशतकेही आहेत.

**जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमधील भारताचे सर्वाधिक धावा करणारे फलंदाज**

रिषभ पंतने आतापर्यंत ८० षटकार मारले आहेत आणि जर त्याने आणखी नऊ षटकार मारले, तर तो बेन स्टोक्सचा सर्वाधिक षटकारांचा (८८) विक्रम मोडेल. जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमध्ये भारताच्या सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत रोहित शर्मा २,७१६ धावांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे, तर रवींद्र जडेजा २,६३२ धावांसह चौथ्या आणि विराट कोहली २,६१७ धावांसह पाचव्या क्रमांकावर आहे. यशस्वी जयस्वालने २,४४३ धावा केल्या आहेत, तर केएल राहुलने २,२६२ धावा केल्या आहेत.

रिषभ पंतने भारतासाठी ५१ कसोटी सामने खेळून ३,६६२ धावा केल्या आहेत. पंतच्या नावावर कसोटी सामन्यांमध्ये २० अर्धशतके आणि आठ अर्धशतके आहेत. त्याने टीम इंडियासाठी ३१ एकदिवसीय आणि ७६ टी-२० सामनेही खेळले आहेत, पण आता तो फक्त लाल चेंडूचे क्रिकेट खेळतो. पंतने २०१७ मध्ये टी-२० फॉरमॅटमध्ये आंतरराष्ट्रीय पदार्पण केले आणि पुढच्याच वर्षी एकदिवसीय व कसोटी संघात स्थान मिळवले. मात्र, तो २०२४ पासून व्हाईट-बॉल क्रिकेटपासून दूर आहे.

**मानव ठरला लंकेसाठी दानव !**

युवा डावखुरा फिरकीपटू मानव सुथारने श्रीलंकेविरुद्धच्या गॅले कसोटी सामन्यात १० बळींची दमदार कामगिरी करत भारताला १६५ धावांनी विजय मिळवून दिला. त्याने पहिल्या डावात ४ आणि दुसऱ्या डावात ६ बळी (६/५५) घेत सामना गाजवला. भारतात अफगाणिस्तान विरुद्ध पदार्पणात ही ६ + १ =७ बळी घेऊन सामनावीर ठरलेल्या मानवने आपल्या सातत्य ठेऊन संघाला विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# दिव्याखाली अंधार! शिक्षण सभापतींच्या जवळील शाळेची दुरवस्था

## परिसरात माकडांचा वावर, गाजर गवत अन् उघडे नालीचे झाकण

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
**मनिष शिंगणे**

विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्याची पायाभरणी करणाऱ्या शाळेचे परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी असणे अपेक्षित असताना उमरेड नगर परिषद स्व. गोवर्धनसिंह भदोरिया बुधवारी प्राथमिक शाळेतील परिस्थिती मात्र याच्या अगदी उलट असल्याचे चित्र समोर आले आहे. शाळेच्या परिसरात माकडांचा मुक्त वावर, अस्वच्छता, पिण्याच्या पाण्याची समस्या, वाढलेले गाजर गवत आणि उघड्या नालीचे झाकण अशा अनेक समस्यांनी शाळेला अक्षरशः विळखा घातला आहे.




विशेष म्हणजे ही शाळा नगर परिषदेच्या शिक्षण सभापतींच्या हाकेच्या अंतरावर येते. त्यामुळे शिक्षण सभापतींच्या जवळील नगर परिषद शाळेची अशी अवस्था असेल, तर शहरातील इतर शाळांच्या परिस्थितीचा अंदाज काय घ्यायचा? असा सवाल पालक मंगेश काळे, श्वेता काळे, श्रीकांत काळे, श्रद्धा काळे, यांनी उपस्थित केला आहे.

**शिक्षकांचा पाठपुरावा, प्रशासन मात्र सुस्त?**

शाळेतील समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी शिक्षकांनी वारंवार पाठपुरावा केल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित समस्यांबाबत पत्र देण्यात आले, दूरध्वनीद्वारे माहिती देण्यात आली, तरीदेखील प्रत्यक्ष परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याने पत्र गेले, फोन झाले; पण समस्या जागच्या जागीच! अशी स्थिती निर्माण झाली आहे. पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधेपासून ते स्वच्छता आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेपर्यंतच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**माकडांनी घेतला शाळेवर ताबा?**

शाळेच्या इमारतीवर आणि गॅलरीमध्ये माकडांचा मोठ्या प्रमाणात वावर असल्याचे स्पष्ट दिसत आहे. विद्यार्थ्यांच्या आवारात अशा प्रकारे माकडांचा वावर असणे धोकादायक ठरू शकते. उद्या एखाद्या विद्यार्थ्याला इजा झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल पालकांकडून केला जात आहे.

त्यातच परिसरात वाढलेले गाजर गवत, अस्वच्छता आणि उघड्या नालीचे झाकण यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे.

**शिक्षण सभापतींच्या बुधवारीतच प्रशासन जड का?**

या संपूर्ण प्रकरणाची शिक्षण विभागात माहिती घेतली असता, शाळेतील समस्यांबाबत प्रशासनाकडे पाठपुरावा झाल्याची बाब समोर आली आहे. तरीही समस्या कायम असल्याने स्वतः शिक्षण सभापती राहत असलेल्या , हाकेच्या अंतरावर असलेल्या शाळेच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासन इतके जड का? असा सवाल माजी नगराध्यक्षा शशिकला बेले यांनी उपस्थित केला.



शाळा ही केवळ इमारत नसून विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा आधार आहे. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने कागदोपत्री आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कृती करून शाळेतील स्वच्छता, पिण्याचे पाणी, नालीची सुरक्षितता, गाजर गवत आणि माकडांचा बंदोबस्त यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रा. मंगेश गिरडकर यांनी केली आहे.

विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यायचे की माकडांपासून स्वतःचा बचाव करायचा? हा प्रश्न आता पालकांसह नागरिकांना पडला आहे. प्रशासन आणखी किती पाठपुराव्याची वाट पाहणार, की विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गांभीयार्ने घेऊन तातडीने कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**नगरसेवकांनी काढले स्वतः गाजर गवत**

काँग्रेसचे सर्व नगरसेवक विशाल देशमुख, महेश भुयारकर, रितेश राऊत, जितेंद्र रेवतकर, मुर्गेश अड्याळवाले, योगेश कन्नाके, रोशन गेडाम, स्मरणिका रहाटे, रंजना बारेकर, जयश्री दिघोरे, कल्याणी गजभिये, जया गिरडकर, करिष्मा कांडळकर, सुरेश चिचमलकर, या शाळेत येऊन गाजर गवत उपडून व स्वतः नगर परिषद कार्यालयाच्या ठिकाणी गाजर गवत टाकून या ठिकाणी निदर्शन केले.

## इंग्रजी ही ज्ञान आणि रोजगाराच्या संधींची गुरुकिल्ली : डॉ. सावन धर्मपुरीवार




**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

इंग्रजी ही केवळ एक भाषा नसून आजच्या जागतिक युगात ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, उच्च शिक्षण आणि रोजगाराच्या असंख्य संधींची गुरुकिल्ली आहे. त्यामुळे ग्रामीण व मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांनी इंग्रजीचा न्यूनगंड अथवा भयगंड न बाळगता आत्मविश्वासाने तिचा अभ्यास करून ती आत्मसात करावी, असे प्रतिपादन विद्यासागर कला महाविद्यालय, रामटेक येथील इंग्रजी विभागप्रमुख डॉ. सावन धर्मपुरीवार यांनी केले. महात्मा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय, पारशिवणी येथे इंग्रजी विभागाच्या वतीने मंगळवारी 'English Study Group' चे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सावन धर्मपुरीवार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लोकचंद जाधव होते.

प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व परिचय करून देताना इंग्रजी विभागप्रमुख प्रा. प्रमोद गोरडे यांनी डॉ. धर्मपुरीवार यांच्या शैक्षणिक, साहित्यिक व अध्यापन क्षेत्रातील योगदानाचा परिचय करून दिला. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ. धर्मपुरीवार यांनी इंग्रजी भाषेचे महत्त्व अत्यंत सोप्या व प्रभावी पद्धतीने विशद केले. इंग्रजी ही विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भाषा आहे. जागतिक स्तरावर शिक्षण, संशोधन, संवाद आणि रोजगाराच्या अनेक क्षेत्रांत इंग्रजीचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे इंग्रजीकडे अडथळा म्हणून नव्हे, तर आपल्या प्रगतीचे साधन म्हणून पाहिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. नियमित वाचन, लेखन, श्रवण आणि संभाषणाचा सराव केल्यास कोणताही विद्यार्थी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवू शकतो, असा विश्वासही त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. लोकचंद जाधव यांनी विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता महाविद्यालयातील ग्रंथालयाचा अधिकाधिक उपयोग करावा, असे आवाहन केले. वाचनाची सवय विद्यार्थ्यांच्या ज्ञानात आणि व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडवून आणते, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पौर्णिमा गायधने यांनी केले, तर डॉ. विलास नागपूरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. महेश चोंडे, प्रा. संदीप भोयर, प्रा. संतोष ठकरेले, प्रा. सुदर्शन अडवे, प्रा. महेंद्र भलमे, प्रा. इंदल आडे, प्रा. मंगल सर, तांडेकर मॅडम व वानखडे मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अनुसूचित समाजाच्या 'भाजप सोडा' अभियानाचा खापरखेड्यातून शुभारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**– महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागातर्फे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त 'अनुसूचित समाज के लोगो, बीजेपी छोड़ो' जनजागृती अभियानाचा शुभारंभ गुरुवारी २० ऑगस्टला सायंकाळी ६ वाजता.



खापरखेडा येथील काँग्रेस कार्यालयात होणार आहे. माजी मंत्री सुनील केदार यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून खासदार श्यामकुमार बर्वे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. प्रदेशाध्यक्ष डॉ. अनिरुद्ध वनकर यांच्या नेतृत्वाखाली हे अभियान महाराष्ट्रातील अनुसूचित जाती समाजात संविधान, सामाजिक न्याय, समता व बंधुतेबाबत जनजागृती करणार आहे. संविधान सत्यशोधक जलसा, संगीतमय प्रबोधन, व्याख्याने व सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे हा संदेश ५ लोकसभा व २९ राखीव विधानसभा मतदारसंघांत पोहोचविण्यात येणार आहे. डॉ. वनकर यांनी संविधानप्रेमी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, कलाकार व रसिकांनी खापरखेड्यातील शुभारंभ कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले. या पत्रकार परिषदेला महासचिव राजेश रंगारी, भाऊराव कोकणे, रत्नदीप रंगारी, स्वप्निल पातोडे, नीरज लोणारे, शैलेंद्र बागडे, आणि जिल्हाध्यक्ष चोखाद्रे यांच्यासह उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी परिश्रम घेत आहे.

# ४० दिवस, ४० Better Nagpur टास्क; नागरिकांच्या समस्यांसाठी समाधानाचा लढा

### बेहतर नागपूर अभियानाला ४० दिवस पूर्ण : रूबी पठाण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय युवक काँग्रेसच्या राज्य सचिव रूबी अब्दुल्ला पठाण यांच्या नेतृत्वाखाली 'मेरा शहर, मेरा हक' अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या Better Nagpur बेहतर नागपूर अभियानाला ४० दिवस पूर्ण झाले. या कालावधीत शहरातील विविध प्रभागांत जनसंवाद साधत नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन ४० टास्क पूर्ण करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. अभियानाचा उद्देश केवळ समस्या प्रसिद्ध करणे नसून, त्या संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवून समाधान होईपर्यंत पाठपुरावा करणे हा असल्याचे महाराष्ट्र समन्वयक राज्य सचिव रुबी अब्दुल्ला पठाण यांनी पत्रकारांना सांगितले.




प्रभाग १७ मधील इंदिरानगर झोपडपट्टी व रमन सायन्स परिसरातील नजूल पट्टयांच्या रखडलेल्या अर्जांची प्रक्रिया पुढे नेण्यात आली. तसेच गटर व सीवर लाइनच्या समस्येसाठी निवेदन देण्यात आले असून, सुविधा उपलब्ध न झाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला. प्रभाग १८ मधील न्यू शुक्रवारी परिसरातील कचरा व अस्वच्छतेची समस्या पाठपुराव्यानंतर दूर करण्यात आली. प्रभाग ९ मध्ये नियमित कचरा संकलनाची मागणी, तर प्रभाग २ मध्ये गटर, पाणी, वीज, सीवर लाइन आणि पावसाळ्यात होणाऱ्या जलभरावाच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. या भागात अनेक ठिकाणी आठ ते पंधरा दिवस पाणी साचत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे अभियानाच्या पाहणीतून समोर आले.

अभियाना दरम्यान महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक, दिव्यांग, छोटे दुकानदार, फळ-भाजी विक्रेते, ऑटो व ई- रिक्षा चालक, सफाई कर्मचारी तसेच स्थानिक नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या नोंदविण्यात आल्या. 'जिथे समस्या आहे, तिथे आम्ही जाऊ; नागरिकांचा आवाज उठवू आणि आश्वासन मिळालेल्या प्रश्नांचा पाठपुरावा करू. गरज पडल्यास आंदोलनही करू,' अशी भूमिका रूबी अब्दुल्ला पठाण यांनी यावेळी मांडली. ४० दिवस पूर्ण झाले असले तरी अभियान थांबणार नसून, 'समस्या ऐकली आहे, आता समाधानासाठी आवाज उठवू' या भूमिकेतून पुढील काळातही नागरिकांच्या प्रश्नांसाठी लढा सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी पत्रपरिषदेत व्यक्त केला.

यावेळी पत्रपरिषदमध्ये रुबी अब्दुल्ला पठाण, रोशनी नितनवरे, विजया सावरकर, शमशुन शेख, रोजी शेख आणि वैशाली आवजे यांची उपस्थिती होती.

# भानेगावचे माजी उपसरपंच विपीन नाईक यांचा वाढदिवस साजरा

### आमदार डॉ. आशिष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

आमदार डॉ. आशिष देशमुख यांचे खंदे समर्थक व भानेगाव ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विपीन नाईक यांचा ४२ वा वाढदिवस १८ ऑगस्ट मंगळवारला नवीन बिना भानेगाव येथे मोठया उत्साहात साजरा करण्यात आला विपीन नाईक मित्र परिवाराच्या वतीने आयोजित या सोहळ्याला राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह कार्यकर्त्यांचा प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. कार्यक्रमाला आमदार डॉ. आशिष देशमुख तसेच जवाहरलाल नेहरू अँल्युमिनियम रिसर्च सेंटरचे सेवानिवृत्त संचालक डॉ. अनुपम अग्निहोत्री यांनी विशेष उपस्थिती लावून विपीन नाईक यांना भावी आयुष्यासाठी आणि राजकीय- सामाजिक वाटचालीस उदंड शुभेच्छा दिल्या.

विपीन नाईक यांनी भानेगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच पदावर कार्यरत असतांना भानेगाव परिसरात अनेक महत्त्वपूर्ण विकासकामे मार्गी लावली २००९ पासून विपीन नाईक आमदार डॉ. आशिष देशमुख यांचे अत्यंत विश्वासू आणि निष्ठावंत सहकारी म्हणून कार्यरत आहेत. आमदार देशमुखांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी परिसरातील दीन-दलित, गरीब व गरजू घटकांची निरंतर सेवा केली आहे. जनसेवेच्या या व्रतस्थ भूमिकेमुळेच भानेगाव व परिसरात त्यांचा मोठा जनसंपर्क आणि मोठा चाहता वर्ग निर्माण झाला आहे.

> विपीन नाईक हे केवळ माझे खंदे समर्थक नसून, तळागाळातील सामान्य माणसाचे प्रश्न सोडवणारे एक अभ्यासू आणि निष्ठावंत लोकप्रतिनिधी आहेत. २००९ पासून त्यांनी माज्यासोबत अत्यंत निष्ठेने कार्य करत दीन-दुबळ्यांची आणि गरिबांची सेवा केली आहे भानेगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच असताना त्यांनी राबवलेली विकासकामे आजही कौतुकास्पद आहेत जनतेशी थेट नाळ जोडलेला असा हा अभ्यासू आणि कार्यक्षम पाठीराखा आहे. त्यांना उत्तम आरोग्य, उदंड आयुष्य आणि भावी यशस्वी सामाजिक-राजकीय प्रवासासाठी माज्या मनापासून हार्दिक शुभेच्छा!

या सोहळ्याप्रसंगी वरिष्ठ भाजप नेते रमेश जैन, भानेगावच्या सरपंच शालिनी चवरे, उपसरपंच सोनू बागडे, ग्रा.पं. सदस्य पुष्पा जालंदर, दर्शना बोरकर, अश्विनी अभ्यंकर, कमलेश भास्कर यांच्यासह शामराव सरोदे, नितीन गोस्वामी, डोमाजी निखाडे, क्रिष्णा चिकनकर, विशाल नाईक, योगेश जालंदर, स्वप्नील खडसे, राहुल चचाने, गंगाधर वारकर, अरविंद चिकनकर, बालू पाठराबे, प्रणय कुंभारे यांच्यासह परिसरातील नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार सुनील जालंदर यांनी मानले.

**थोडक्यात**

## क्रांतिज्योती यात्रेचे दहेगाव येथे स्वागत



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

मोझरी येथील गुरुकुंज आश्रम (अमरावती) येथून ९ ऑगस्ट या क्रांतिदिनी निघालेली 'क्रांतिज्योती यात्रा' विदर्भभरात जनजागृती करत दहेगाव रंगारी येथे पोहोचली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामसुधारणा आणि स्वच्छतेचे दिलेले विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे हा या यात्रेचा मुख्य उद्देश आहे आपले गाव स्वच्छ आणि सुंदर ठेवल्यास आपले कुटुंबही निरोगी राहील असा संदेश या यात्रेच्या माध्यमातून देण्यात येत आहे. दहेगाव रंगारी येथील पुंडलिकबाबू चौधरी यांचे जावई कै. प्रकाश ठाकरे यांच्या निधनानिमित्त त्यांच्या निवासस्थानी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पादुकांची पालकी ठेवून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर ही यात्रा कोराडी मंदिराच्या दिशेने पुढील प्रवासासाठी रवाना झाली.

या प्रसंगी गुरुकुंज आश्रमातून आलेले बाबाराव पाटील, डॉ. धनेश्वर मुंडे, राजेंद्र गाडगे, नीलकंठ क्रमे गुरुजी, अभिदादा राऊत, बाबा राऊत देवतारे, भास्कर पिंपरे, दिगंबर पांडे, वेदांत पांडे, मोहनदास सपाटे, सुनील बर्गी, प्रकाशराव भालेराव, प्रकाश चौधरी, गंगाधर मोहल्ले, दुरेशराव चौधरी, गंगाधर दौडके, बलवंतराव ठाकरे, सुरेशजी, करण माजरे, मुकेशजी काकडे, कामराजी ढेंगरे, विजयराव फुटे, पंकज चौधरी यांच्यासह अनेक गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाहन चोरीचे दोन गुन्हे उघडकीस, ९० हजारांचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

वाडी पोलिसांच्या तपास पथकाने वाहन चोरीच्या दोन गुन्ह्यांचा छडा लावत एका आरोपीला ताब्यात घेतले. या कारवाईत चोरीच्या दोन दुचाकी असा एकूण सुमारे ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रजनीकांत उर्फ रजत खोब्रागडे (वय ४१, रा. आमगाव देवळी, ता. हिंगणा, जि. नागपूर; हल्ली रा. लकडगंज, नागपूर) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून वाडी पोलिस ठाणे हद्दीतील वाहन चोरीच्या गुन्ह्यातील होंडा ॲक्टिव्हा मोपेड (किंमत अंदाजे ३० हजार रुपये) तसेच एमआयडीसी पोलिस ठाणे हद्दीतील गुन्ह्यातील होंडा शाईन मोटरसायकल (किंमत अंदाजे ६० हजार रुपये) जप्त करण्यात आली.

आरोपीकडून वाडी व एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील असे एकूण दोन गुन्हे उघडकीस आणण्यात आले. आरोपीची वैद्यकीय तपासणी करून त्याला न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले. ही कारवाई वाडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन मगर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथक प्रमुख सहायक पोलिस निरीक्षक कुणाल धुरट तसेच पोलीस हवालदार नागेश्वर दासरवार, विजय, राहुल, पोलीस हवालदार व पोलीस शिपाई दिलीप यांच्या पथकाने केली.

## सती अनुसया माता विद्यालय, पारडसिंगा येथे विद्यार्थी सत्कार सोहळा





**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नुकताच सती अनुसया माता विद्यालय जलालखेडा रोड पारडसिंगा येथे शेतकरी संघर्ष कृती समिती काटोल (बं. स )जि नागपूर, महा. राज्यातर्फे गजाननराव मापले (दिव्यांग समिती सदस्य) यांनी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन केले होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुनीताताई काळे (अन्नपुरवठा सदस्य व लोककला मंडळ अध्यक्ष महा.),प्रमुख उपस्थितीत समितीचे अध्यक्ष बाबारावजी वाघमारे व ज्योसनाताई मदनकर, सरिता ताई डांगोरे (आशा वर्कर),युवराज आमले, गिरीशजी शेंडे, अरुणाताई येवले, शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा सोनवणे,नलिनी भडागे, सपना चौहान, नलूजी बावनकर,रंजना बालपांडे व शिक्षक गण उपस्थित होते.

दहावीची विद्यार्थ्यांनी निशिका भक्ते हिने ९१% गुण घेऊन उत्तीर्ण झाली होती तिचा सत्कार फुलगुच्छ बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला अशा प्रकारे सुमारे २५ विद्यार्थी व विद्यार्थिनींचा बुक,पेपर बॅग, पेन्सिल, रोख रक्कम देऊन स्वागत करण्यात आले व संपूर्ण विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. सर्वांनीच आपल्या संबोधनात गजानन मापले यांच्या कार्याची स्तुती केली. शाळेतर्फे कार्यक्रमाचे उत्तम आयोजन नियोजन केल्याबद्दल शाळेच्या सर्वच कर्मचारी गण यांचे अभिनंदन व सर्वांनीच आभार व्यक्त केले मोठ्या संख्येने विद्यार्थी व विद्यार्थिनी व इतरांची मोठ्या संख्येने उपस्थिती बघावयास मिळाली.

## 'सिटिझन सायन्स सीरिज २०२६' उद्या

### सायबर सुरक्षेबाबत जनजागृतीसाठी विशेष आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रो. राजेंद्र सिंग सायन्स एक्स्प्लोरेटरीच्या वतीने 'सिटिझन सायन्स सीरिज २०२६' अंतर्गत पहिल्या सत्राचे आयोजन शुक्रवार, २१ ऑगस्ट रोजी करण्यात आले आहे. हे सत्र दुपारी ३.३० वाजता तारकुंडे हायस्कूल, दुसरा मजला, शंकर नगर मेट्रो स्टेशनजवळ, नॉर्थ अंबाझरी रोड, नागपूर येथे होणार आहे. या सत्रात नागपूर शहर पोलीस विभागाच्या सायबर सेलच्या वुमन हेड कॉन्स्टेबल व सायबर टेक्निकल मेंबर श्रद्धा ढोमणे प्रमुख वक्त्या राहतील. सायबर सुरक्षा, ऑनलाइन फसवणूक आणि डिजिटल गोपनीयता याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सायबर सुरक्षेबाबत जनजागृती वाढविणाऱ्या या उपक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रो. राजेंद्र सिंग सायन्स एक्स्प्लोरेटरीच्या संचालक डॉ. सीमा उबाळे यांनी केले आहे.

# रंगला स्त्रीशक्तीचा उत्सव, आनंदाचा जल्लोष

## महापौर श्रावण उत्सव सोहळ्याला महिलांचा उत्स्फूर्त सहभाग




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर महानगरपालिकेच्या वतीने महिलांच्या दैनंदिन जबाबदाऱ्या आणि व्यस्त जीवनशैलीतून त्यांना आनंदाचे काही क्षण अनुभवता यावेत, आप्तमैत्रिणींसोबत मनमोकळेपणाने वेळ घालवता यावा आणि त्यांच्यातील आत्मविश्वास व सक्षमीकरणाला प्रोत्साहन मिळावे, या हेतूने महापौर श्रावण उत्सव सोहळा मनपातर्फे आयोजित करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने के. टी. नगर येथील नक्षत्र उद्यानात उत्साहपूर्ण वातावरणात आज (ता. १९) हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महापौर श्रीमती निता ठाकरे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्रावणाच्या निमित्ताने आयोजित या आनंदोत्सवात महिलांनी विविध उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. विशेष म्हणजे, मनपाच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने महिलांसाठी प्रथमच अशा स्वरूपाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला.
कार्यक्रमात माजी महापौर दयाशंकर तिवारी, माजी महापौर वसुंधरा मसुरकर, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, धरमपेठ झोन सभापती धनश्री देशपांडे, मंगळवारी झोन सभापती श्रीमती सीमा डवरे, गलिच्छ वस्ती सभापती रुतीका मसराम, नगरसेविका साधना बरडे, माधुरी टेकाम, योगिता तेलंग, ममता ठाकूर, पूजा पाठक, वर्षा चौधरी, सरस्वती सलामे, स्नेहल ठाकरे, सुनीता तभाने, माजी नगरसेविका वर्षा ठाकरे, माजी नगरसेविका विनया फडणवीस, प्रगती पाटील, क्रीडा विभागाच्या उज्वला चरडे, कार्यकारी अभियंता सविता गणोरकर यांच्यासह मनपाचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.
माजी महापौर दयाशंकर तिवारी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना तिवारी यांनी सांगितले की, महिलांना सन्मानाचे स्थान मिळावे, त्यांच्या सक्षमीकरणाला चालना मिळावी आणि महिलांनी एकत्र येऊन आनंदाचे क्षण अनुभवावेत, या उद्देशाने अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. महिलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा आणि त्यांचा उत्साह द्विगुणित व्हावा, हाच या कार्यक्रमा मागील मुख्य हेतू असल्याचे त्यांनी नमूद केले. यापूर्वीही आपल्या संकल्पनेतून महिलांसाठी अशा स्वरूपाचे विविध उपक्रम राबविण्यात आले असून, त्याच परंपरेत हा श्रावण उत्सव आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. वर्षभर घर, कुटुंब, मुलं आणि कामाच्या जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळणाऱ्या महिलांना काही काळ स्वतःसाठी देता यावा, मनमोकळेपणाने आनंद लुटता यावा आणि मैत्रिणींसोबत उत्सव साजरा करता यावा, यासाठी हा विशेष उपक्रम घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**विजेत्यांची नावे**
यावेळी महिलांनी विविध कार्यक्रमात सहभाग घेऊन आनंद लुटला. यावेळी श्रावण गीते, फॅशन शो, डान्स , गाणे , मजेशीर खेळ घेण्यात आले. नागपूर महानगरपालिकेद्वारा सहभागी महिलांना भेटवस्तू देण्यात आल्या. कार्यक्रमात श्रावण क्वीन, फुल राणी, तुझी माझी जोडी आणि रंग माझा हिरवाअशा विविध मनोरंजक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विविध मनोरंजनात्मक उपक्रमांनी कार्यक्रमात रंगत आणली. यावेळी सर्व विजेत्या महिलांना "पैठणी साडी व डिनर सेट" देऊन गौरविण्यात आले. राजश्री बिस्वास, सोनिया बरकी, नेहा त्रिवेदी, महिमा चौधरी या विविध खेळाच्या विजेत्या ठरल्या. रंग माझा हिरवा स्पर्धेत पूजा दायमा, श्रावण क्वीन भावना, नृत्य स्पर्धेत संजीवनी, श्वेता तिवारी, ज्योती सहारे, भाविका नेवारे यांनी बाजी मारली.

## वसतिगृह प्रवेशासाठी ऑफलाईन अर्ज करण्यासाठी शेवटचे दोन दिवस

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** शासकीय वसतिगृह प्रवेशाच्या शालेय तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेशाचे अर्ज स्विकारून प्रवेश देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. मात्र जे विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षात प्रवेशीत होते व स्वाधार योजनेचा लाभ घेतला होता. अशा विद्यार्थ्यांना पुढील अभ्यासक्रमासाठी वसतिगृह प्रवेशाची संधी उपलब्ध झालेली नाही. कारण ते तांत्रीक दृष्ट्या स्वाधार योजनेचा लाभ घेत होते. अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये व वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहू नये म्हणून या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशासाठी ऑफलाईन अर्ज करण्याची संधी २१ ऑगस्टपर्यंत उपलब्ध करून देण्यात येत आहे. अशा विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी देण्यासाठी महाआयटी टीम यांना पुर्वसूचना देण्यात आलेली होती. तथापि पोर्टलवर तांत्रीक बाबींची पुर्तता न झाल्याने अशा विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज स्विकारता आले नाही. या विद्यार्थ्यांना ऑफलाईन अर्ज करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. मागील अभ्यासक्रमासाठी स्वाधार योजनेचा लाभ घेतलेला आहे व यावर्षी नवीन अभ्यासक्रमासाठी वसतिगृह योजनेचा लाभ घ्यावयाचा आहे. अशा विद्यार्थ्यांनी दिनांक २१ ऑगस्टपर्यंत ऑफलाईन रित्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे शासकीय वसतिगृह, रहाटे कॉलनी, नागपूर येथे आफलाईन अर्ज करावा.

## बामणी-राजुरा राष्ट्रीय महामार्गाच्या कामाची पाहणी : खा. धानोरकरांचे अधिकाऱ्यांना निर्देश

### शेतकऱ्यांच्या अडचणी तातडीने दूर करण्याचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला आदेश



**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**
राष्ट्रीय महामार्गाच्या विकासासोबतच स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांच्या हिताचे जतन होणे आवश्यक आहे. महामार्गाच्या कामामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश खासदार प्रतिभा धानोरकर यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना दिले. नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची नुकतीच भेट घेऊन खासदार प्रतिभा धानोरकर यांनी राष्ट्रीय महामार्गाशी संबंधित विविध समस्या तसेच महामार्ग बाधितांच्या प्रश्नांवर चर्चा केली होती. त्यानंतर त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. तसेच बामणी ते राजुरा राष्ट्रीय महामार्गावर सुरू असलेल्या सर्व्हिस रोड व पुलाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान निमार्णाधीन पुलाची उंची प्रमाणापेक्षा अधिक झाल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना शेतात ये-जा करताना अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले. याची गंभीर दखल घेत खासदार धानोरकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून शेतकऱ्यांच्या मार्गातील अडथळे तातडीने दूर करण्याच्या सूचना दिल्या. रस्ते आणि पुलांचा विकास हा जनतेच्या सुविधेसाठी आहे. मात्र, या विकासकामांमुळे बळीराजालाच त्रास होत असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही. प्राधिकरणाने तातडीने पर्याय शोधून शेतकऱ्यांची वाहतूक सुरळीत करावी, अशी स्पष्ट भूमिका खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मांडली.
या पाहणी व बैठकीवेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार सुभाष धोटे, नगराध्यक्ष अरुण धोटे, उपविभागीय अधिकारी रवींद्र माने, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रोजेक्ट डायरेक्टर प्रविण कुमार बीजेवार, जी. आर. इन्फ्रा कंपनीचे अधिकारी गिरीश खंडेलवार, कनिष्ठ इंजिनिअर वाढी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संतोष इंदूरवार, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शंतनू धोटे, राजुरा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रंजन लांडे, शहराध्यक्ष तथा माजी नगरसेवक हरजीतसिंग संधु, बल्लारपूर नगर परिषद चे उपाध्यक्ष देवेंद्र आर्य, माजी नगराध्यक्ष रमेश नळे, नगरसेवक सिद्धार्थ पथाडे यांच्यासह नगर परिषदेचे सभापती, नगरसेवक, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, नागरिक आणि बाधित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाच वर्षापासून विठ्ठल मंदिर विश्वस्त मंडळाची निवडणूक नाही!

### दोन वर्षांपासून आमसभाही रखडली, 'क' दर्जाच्या देवस्थानात कारभाराचा सावळागोंधळ?




**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
स्थानिक भाविकांचे आणि वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान असलेल्या येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती देवस्थानाच्या (र. नं. ए/५६०/एन) विश्वस्त मंडळाच्या कारभारावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विश्वस्त मंडळाची नियमानुसार मुदत संपूनही तब्बल पाच वर्षांपासून नवीन निवडणूक झालेली नाही, तर गेल्या दोन वर्षांपासून आमसभाही घेण्यात आलेली नसल्याने भाविकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. 'क' दर्जा प्राप्त देवस्थानाच्या या प्रकाराकडे धर्मदाय आयुक्त कार्यालयाचेही दुर्लक्ष होत असल्याचा आरोप भाविकांकडून केला जात आहे.
देवस्थानाच्या नियमावलीनुसार विश्वस्त मंडळातील सदस्यांची दर तीन वर्षांनी आमसभेतून निवड होणे अपेक्षित आहे. विश्वस्त निवडीसाठी २०२१ मध्ये शेवटची निवडणूक घेण्यात आली होती. त्यानंतर सप्टेंबर २०२४ मध्ये विद्यमान विश्वस्त मंडळाने नवीन विश्वस्त निवडीसाठी आमसभेचे आयोजन केले होते. मात्र, या सभेत उपस्थित सदस्यांनीच विद्यमान विश्वस्त मंडळाच्या वैधतेवर आक्षेप घेत ते असंवैधानिक असल्याचा आरोप केला.
या वादानंतर धर्मदाय आयुक्तांची आवश्यक परवानगी घेऊनच नवीन विश्वस्त मंडळाची निवड करण्याचे सभेत एकमताने ठरल्याचे सांगण्यात येते. मात्र, त्यानंतर जवळपास दोन वर्षांचा कालावधी उलटूनही ना आमसभा झाली, ना नवीन विश्वस्त मंडळाच्या निवडीचा मार्ग मोकळा झाला. त्यामुळे देवस्थानाचा कारभार नेमका कोणाच्या अधिकारात सुरू आहे, असा सवाल भाविकांकडून उपस्थित केला जात आहे.

**नियमावली केवळ कागदावरच?**
विश्वस्त मंडळाचा कार्यकाळ संपल्यानंतरही नवीन मंडळाची निवड न करणे आणि वार्षिक आमसभा न घेणे हे देवस्थानाच्या घटनेतील नियमांचे उल्लंघन असल्याचे भाविकांचे म्हणणे आहे. त्यामुळे विद्यमान विश्वस्त मंडळाच्या कारभाराची चौकशी करून त्यांना आमसभा घेण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.
विशेष म्हणजे, हा केवळ विश्वस्त मंडळाचा अंतर्गत वाद नसून हजारो भाविकांच्या श्रद्धेशी संबंधित विषय आहे. त्यामुळे धर्मदाय आयुक्त कार्यालयाने या प्रकरणात किती काळ डोळेझाक करायची, असा संतप्त सवाल भाविकांकडून केला जात आहे.

**धर्मदाय आयुक्त कार्यालय जागे होणार कधी?**
'क' दर्जा प्राप्त देवस्थानाच्या विश्वस्त मंडळाची निवडणूक आणि आमसभा वर्षानुवर्षे रखडत असताना संबंधित प्रशासन नेमके काय करत आहे? विद्यमान विश्वस्त मंडळाचा कार्यकाळ संपल्यानंतरही कारभार सुरू ठेवण्यास कोणाची परवानगी आहे? या संपूर्ण प्रकरणाची धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडून चौकशी होणार का, असे प्रश्न आता उपस्थित झाले आहेत. भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र असलेल्या विठ्ठल मंदिराचा कारभार नियमांनुसार आणि पारदर्शकपणे चालणे गरजेचे आहे. त्यामुळे धर्मदाय आयुक्त कार्यालयाने तातडीने लक्ष घालून देवस्थानाची आमसभा बोलावून नियमानुसार नवीन विश्वस्त मंडळाची निवड करण्याची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी भाविकांकडून होत आहे.

## स्फोटकांनी भरलेल्या व्हॅनची आग विझवून टळला मोठा अनर्थ, खापरखेडा पत्रकार संघाकडून मुस्लिम बांधवांचा सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**
जवळपास सहा टन अत्यंत संवेदनशील स्फोटकांनी (बारूद) भरलेल्या एका व्हॅनच्या टायरला धूर निघून आग लागल्याची घटना १८ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास खापरखेडा येथील चिकन मार्केटसमोर घडली. मात्र स्थानिक मुस्लिम बांधवांनी जीवाची पर्वा न करता दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे एक मोठा अपघात टळला आहे. स्फोटकांचा साठा असलेल्या एक्सप्लोसिव्ह व्हॅनच्या टायर मधून धूर निघत असल्याचे दिसताच परिसरात भितीचे वातावरण पसरले होते मात्र स्थानिक चिकन विक्रेते शफीक अन्सारी, अकरम कुरेशी आणि तौशिफ फजलानी यांनी वेळेवर समयसूचकता दाखवली. तात्काळ घटनास्थळी धाव घेत एक्सप्लोसिव्ह व्हॅनच्या टायरवर पाण्याचा मारा केला व अथक प्रयत्नांनंतर आग पूर्णपणे विझवली या तिघांच्या धैर्यामुळे खापरखेडा परिसरातील हजारो नागरिकांचे प्राण वाचले. या तीन मुस्लिम बांधवांची उल्लेखनीय कार्याची दखल घेत नागपूर जिल्हा मराठी पत्रकार संघ संलग्न खापरखेडा पत्रकार संघाच्या वतीने भिमालय कार्यालयात सत्कार सोहळ्याचे आयोजन १९ ऑगस्ट बुधवारला सायंकाळी करण्यात आले होते. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आरपीआय) नेते पृथ्वीराज बोरकर यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला.
कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या हस्ते शफीक अन्सारी, अक्रम कुरेशी व तौशिफ फजलानी यांचा शाल, श्रीफळ आणि वृक्ष भेट देऊन भावूक वातावरणात गौरव करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना तिन्ही सत्कारमूर्तींनी ये तो हमारा फर्ज था अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या.
यावेळी अध्यक्षीय भाषणात बोलताना पृथ्वीराज बोरकर व इतर मान्यवरांनी सांगितले की स्फोटक वाहनाची आग विझवून हजारो लोकांचे प्राण वाचवणे हे केवळ धैर्याचे काम नाही तर ते हिंदू-मुस्लिम एकतेचे एक उत्तम प्रतीक आहे. समाजासमोर आदर्श निर्माण करणारे आणि प्रत्येकाला प्रेरणा देणारे हे कार्य आहे असे सांगितले.
या सोहळ्याला अशोक झिंगरे, राहुल तिवारी, हेमराज परिहार, शामराव सरोदे, राहुल बागडे, दिवाकर घेर, अमर जैन, मनोज डेव्हिड, कपिल वानखेडे, केशव पानतावणे, विलास महल्ले, अनेश चवरे, पुरुषोत्तम मानकर, कृष्णदेव सोनी, विनोद गोडबोले, मयूर तुरपुडे, विक्की थापा, मनोहर डोंगरे, नरेश पानतावणे, धीरज देशभ्रतार ययांच्यासह पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
कार्यक्रमाचे संचालन खापरखेडा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील जालंदर यांनी केले, तर आभार सचिव अभय मिश्रा यांनी मानले.

**थोडक्यात**

## पारशिवनीत २८ वर्षीय तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**
पारशिवनी येथे पत्नी निघून गेल्याच्या नैराश्यातून आणि दारूच्या आहारी गेल्यामुळे २८ वर्षीय तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवार-मंगळवारच्या रात्री



उघडकीस आली. पारशिवनी पोलीस स्टेशन अंतर्गत कलम १९४ बीएनएसएस नुसार आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निखील चंद्रभान नागोसे वय २८ वर्ष, रा. प्रभाग क्र. १३, पीडब्ल्यूडी क्वार्टर, पारशिवनी , हा मंगळवारी १८ ऑगस्ट रोजी चे रात्री १०-३० वा. ते बुधवार १९ ऑगस्टचे सकाळी ८-३० वा. दरम्यान मौजा प्रभाग क्र. १३, पारशिवनी येथील राहत्या घरी बेडरूममध्ये राहत होता.
फिर्यादी आणि मृतकाचा भाऊ समीर चंद्रभान नागोसे वय २८ वर्ष यांनी दिलेल्या तोंडी रिपोर्टनुसार, निखीलची पत्नी सुमारे ५ महिन्यांपूर्वी माहेरी निघून गेली होती. तेव्हापासून तो टेन्शनमध्ये होता आणि नेहमी दारू पिण्याचे प्रमाण वाढले होते. मंगळवारी सकाळी घरातील बेडरूममध्ये त्याने सिलिंग फॅनच्या लोखंडी कड्याला काळ्या वायरने गळफास घेऊन आत्महत्या केली असावी, असा संशय आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. पुढील तपास पारशिवनी पोलीस करीत आहेत.

## सेठ केसरिमल पोरवाल महाविद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान मेळावा संपन्न




**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**
सेठ केसरिमल पोरवाल महाविद्यालय, कामठी येथे तालुकास्तरीय विज्ञान मेळावा व विज्ञान नाटोत्सव स्पर्धांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता, संशोधनवृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, या उद्देशाने या विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात तालुक्यातील विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रतिकृती, प्रयोग, प्रकल्प तसेच विज्ञान विषयक विविध उपक्रमांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व वैज्ञानिक ज्ञानाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.
कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजन पंचायत समिती कामठी यांनी केले या प्रसंगी पंचायत समितीतर्फे मसारकर मॅडम व इतर अधिकारी उपस्थित होते तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. स्वप्नील दाहाट यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य व्ही. बी. वंजारी, पर्यवेक्षक एन. डी. मेंढे तसेच विज्ञान विभागातील शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. सदर स्पर्धेचे परीक्षण सेठ केसरीमल महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक योगेश मार्चटववार तसेच श्रीमती बावनकुळे यांनी केले. या विज्ञान मेळाव्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या वैज्ञानिक कल्पना व प्रयोग सादर करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसरात विज्ञानमय वातावरण निर्माण झाले.

## तारसा येथे स्व.गोपालराव लोहबरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त भव्य आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
आरोग्याची काळजी घेणारा समाजच सक्षम समाज घडवतो आणि रक्तदानाचा एक थेंब कुणाच्यातरी आयुष्याला नवी आशा देतो, हे उदात्त हेतू ठेवून आज बुधवार (ता.१९ ऑगस्ट) रोजी श्री साईश्वर हॉल, तारसा येथे स्व. गोपालराव लोहबरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त स्व. गोपालराव लोहबरे बहुउद्देशीय शिक्षण संस्था, तारसा यांच्या वतीने भव्य आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.
याप्रसंगी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, माजी महिला व बालकल्याण जि. प. नागपूर सभापती नंदा गोपाल लोहबरे, भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष ग्रामीण रामटेक विरेंद्र पायतोडे, माजी सदस्या, पं. स. मौदा कीर्ती वीरेंद्र पायतोडे, सरपंच ग्रा. पं. तारसा वैशाली आनंद लेंडे, उपसरपंच, ग्रा. पं. तारसा चंद्रशेखर गभने, महेश हटेवार,शुभम गभने,विकास झाडे, अरुण फुले, राहुल सोमनाथे, प्रदीप राऊत, विनायक महादुले, राकेश चव्हाण तसेच ग्रामपंचायत सदस्यगण, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरोग्यसेवा, रक्तदान आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून समाजहिताचा हा प्रेरणादायी उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असल्याने स्व. गोपालराव लोहबरे यांच्या सामाजिक कार्याच्या स्मृतींना हीच खरी आदरांजली असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## साखरेची शंभरीकडे वाटचाल

**मुंबई :** सध्या सणासुदीच्या काळाला सुरुवात झाली आहे. या काळातच ग्राहकांना मोठा झटका बसला आहे. कारण साखरेच्या दरात मोठी वाढ होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या सणासुदीच्या काळात मोठ्या प्रमाणात मिठाईची खरेदी विक्री होत असते. मात्र, साखरेच्या वाढत्या दरामुळे मिठाईच्या किंमतीमध्ये देखील वाढ होण्याची शक्यता आहे. गेल्या १८ दिवसात साखरेच्या दरात तब्बल १८ रुपयांची वाढ झाली आहे. मध्य प्रदेशात साखरेच्या दरात मोठी वाढ होत आहे. गेल्या अवघ्या १८ दिवसांत साखरेचा भाव जवळपास १८ रुपये प्रति किलोने वाढला आहे.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : गुरूवार, २० ऑगस्ट २०२६

थोडक्यात

## चनकापूर ग्राउंड परिसरात कारमध्ये चौघे संशयास्पद स्थितीत आढळले

### दोन इसमासह दोन अल्पवयीन मुली ताब्यात

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

स्थानिक पोलिस स्टेशन हद्दीत अवैध धंदे व अमली पदार्थ विक्रीच्या वाढत्या घटनेमूळे सर्वसामान्य नागरिकांची सुरक्षा



ऐरणीवर आली असताना पोलीस पेट्रोलिंग करीत असताना १८ ऑगस्ट मंगळवारप रात्रीच्या सुमारास चनकापूर ग्राउंड परिसरात एका कार मध्ये दोन इसम व दोन अल्पवयीन तरुणी संशयास्पद स्थितीत आढळून आल्यामूळे एकच खळबळ उडाली आहे. प्रवीण प्रशांत कानूने वय ५३ रा नागपूर, सुभाष सुधाकर उके वय ४१ रा इमामवाडा व दोन अल्पवयीन तरुणींना खापरखेडा पोलिसानी ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १८ ऑगस्ट मंगळवारला रात्री १०:३० च्या सुमारास खापरखेडा पोलिस पेट्रोलिंग करत होते दरम्यान चनकापूर ग्राउंड परिसरात युनोवा कार क्रमांक एमएच-१५-जीएल-४७५५ संशयास्पदरित्या उभी असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले पोलिसांनी तात्काळ कारजवळ जाऊन पाहणी केली असता यावेळी दोन इसम व दोन अल्पवयीन मुली अमली पदार्थाचे सेवन करत असल्याचे माहिती समोर येत आहे. खापरखेडा पोलिसानी ताब्यात घेतलेले आरोपी नागपूर येथील रहिवासी असल्याचे कळते ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून कलम २७ व २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती मिळाली असून पुढील तपास सुरू आहे.

## श्रीकृष्ण नृत्यालयम व श्रीकृष्ण कल्चरल फाउंडेशनतर्फे 'कृष्णमयूकहम- २०२६' चार दिवसीय सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय शास्त्रीय नृत्य, संगीत व वाद्यकलेचा समृद्ध वारसा जपण्यासाठी श्रीकृष्ण नृत्यालयम व श्रीकृष्ण कल्चरल फाउंडेशनतर्फे 'कृष्णमयूकहम-२०२६' या चार दिवसीय सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत बुधवारी झालेल्या पत्रकार परिषदेत आयोजकांनी माहिती दिली. हा महोत्सव २० ते २३ ऑगस्टदरम्यान गुरुनानक भवन येथे होणार आहे. महोत्सवात महाराष्ट्रासह केरळ, मध्य प्रदेश, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात, पश्चिम बंगाल, दिल्ली, छत्तीसगड आदी राज्यांतील नामांकित कलाकार सहभागी होणार आहेत. २० ऑगस्ट रोजी माधुरी गुर्जर यांचे हिंदुस्तानी गायन, २१ ऑगस्ट रोजी खुशी जैन यांचे भरतनाट्यम व रिमिता पॉल यांचे मणिपुरी नृत्य, तर २२ ऑगस्ट रोजी डॉ. वट्टिकोट्टा यादगिराचार्य यांचे कुचिपुडी आणि यामिनी सुंदरम यांचे भरतनाट्यम सादरीकरण होणार आहे.

२३ ऑगस्ट रोजी समारोप सोहळ्यात दिल्लीच्या रूपा राणी दास बोरा यांचे कथक, पुण्याचे अनिरुद्ध देशपांडे यांचे तबला वादन, बंगळुरूचे गुरु राजू एन. यांचे कुचिपुडी तसेच डॉ. हनी उन्नीकृष्णन यांचे मोहिनीअट्टम सादरीकरण होणार आहे. त्यानंतर स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात येईल. महोत्सवासाठी समर कुमार सेन, डॉ. प्रमोद लाखे, रवी पी.कुकडे, गजानन रानडे आणि पंकज कुमार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. आकाशवाणीचे उच्च श्रेणीचे सतारवादक अवनींद्र शोएलिकर यांचीही विशेष उपस्थिती राहणार आहे. श्रीकृष्ण कल्चरल फाउंडेशनच्या संस्थापक व सचिव तसेच श्रीकृष्ण नृत्यालयमच्या प्राचार्या प्रमेस्ला उन्नीकृष्णन यांनी नागपूरकर कलाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महोत्सवाचा आनंद घ्यावा, असे पत्र परिषदेत आवाहन केले. महोत्सवाच्या आयोजनासाठी समन्वयक हरी उन्नीकृष्णन, पीयूष बोबडे, मयूर देशमुख, सागर चोपडे, भावेश यांच्यासह स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत.

## आर्थिक अडचणीतून उमरेडच्या गाव तलावात उडी, ४८ वर्षीय व्यक्तीचा बुडून मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

घर बांधकामासाठी लागणाऱ्या पैशांच्या आर्थिक अडचणीमुळे मानसिक तणावातून एका ४८ वर्षीय व्यक्तीने उमरेड येथील गाव तलावात उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवार, दि. १९



ऑगस्ट रोजी उघडकीस आली. मोहन दयाराम शेरकी वय ४८, रा. कावरापेठ, उमरेड असे मृतकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहन शेरकी हे बुधवारी पहाटे सुमारे ४ वाजता घराबाहेर गेले होते. बराच वेळ होऊनही ते घरी परत न आल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. गाव तलाव परिसरात शोध घेतला असता त्यांची चप्पल आढळून आली. त्यानंतर दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास तलावाच्या पाण्यात एक व्यक्ती आढळून आली. पोलिस व गावकऱ्यांच्या मदतीने त्यांना पाण्याबाहेर काढून उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, उमरेड येथे नेण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

घर बांधकामासाठी लागणाऱ्या पैशांबाबत निर्माण झालेल्या आर्थिक अडचणीमुळे मानसिक तणावातून त्यांनी तलावात उडी घेऊन आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या घटनेबाबत मृतकाचा मुलगा साहिल मोहन शेरकी वय १९ यांच्या तोंडी रिपोर्टवरून उमरेड पोलीस ठाण्यात मर्ग दाखल करण्यात आला आहे. घटनेत कोणताही संशय नसल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार अश्विन ढोबळे करीत आहेत.

# भाडिपार गावातील रस्ते चिखलमय, ग्रामपंचायत व जिल्हा बांधकाम विभाग सुशेगात!

### नागरिकांच्या सूचनांकडे दुर्लक्ष, विद्यार्थ्यांसह वाहनधारकांची गैरसोय

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

पावसाळा पूर्णपणे सुरू झाल्याने ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. भाडिपार गावातील अनेक रस्त्यांवर डांबर उखडून जागोजागी मोठमोठे खड्डे पडले असून, पावसाचे पाणी व चिखल साचल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र, या गंभीर समस्येकडे संबंधित ग्रामपंचायत बोदलबोडी तसेच जिल्हा बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून



करण्यात येत आहे.

भाडिपार गावातील रस्त्यांची अवस्था इतकी खराब झाली आहे की, रस्त्यावर खड्डा आहे की खड्ड्यात रस्ता आहे, असा प्रश्न वाहनधारकांना पडत आहे. पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल साचत असल्याने विशेषतः दुचाकीस्वारांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे. यामुळे घसरून पडण्याच्या घटना घडत असून, लहान-मोठ्या अपघातांचा धोका वाढला आहे.

गावातील नागरिकांनी वेळोवेळी रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत ग्रामपंचायत व संबंधित प्रशासनाकडे सूचना व मागण्या केल्या असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, नागरिकांच्या या मागण्यांकडे गांभीयार्ने पाहिले जात नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पावसाळ्यात दरवर्षी हीच परिस्थिती निर्माण होत असून, कायमस्वरूपी उपाययोजना करण्याऐवजी केवळ तात्पुरत्या स्वरूपाची मलमपट्टी केली जात असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे विद्यार्थ्यांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. चिखलातून शाळेत ये-जा करताना विद्यार्थ्यांचे कपडे व पुस्तके खराब होण्याबरोबरच घसरून पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पालकांमध्येही चिंता व्यक्त होत आहे.

जिल्हा बांधकाम विभाग सुशेगात आणि ग्रामपंचायत कुंभकर्णी झोपेत अशी संतप्त प्रतिक्रिया काही ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. स्वच्छ, सुरक्षित व गुळगुळीत रस्त्यांचे दावे करणाऱ्या प्रशासनासमोर भाडिपार गावातील चिखलमय रस्त्यांनी वास्तव परिस्थिती उघड केली आहे.

आता तरी संबंधित ग्रामपंचायत, जिल्हा बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधी जागे होऊन या रस्त्यांची तातडीने पाहणी करून खड्डे बुजविणे, चिखलाची समस्या दूर करणे आणि रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. एखादा मोठा अपघात घडल्यानंतर प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

त्यामुळे संबंधित प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन रस्त्यांची दुरुस्ती करावी, विद्यार्थ्यांसह सर्व नागरिकांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी पालक व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## सालेकसा पोलिसांची उल्लेखनीय कारवाई, चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

मौजा असईटोला येथे घरातून स्वयंपाकाचे बर्तन व इतर साहित्य चोरीला गेल्याप्रकरणी सालेकसा पोलिसांनी गुन्ह्याचा छडा लावत एका आरोपीस अटक करून चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस स्टेशन सालेकसा येथे मौजा असईटोला येथील सुमारे १७ हजार रुपये किमतीचे स्वयंपाकाचे बर्तन-भांडे चोरीस गेल्याची तक्रार प्राप्त झाली होती. याप्रकरणी दिनांक ४ ऑगस्ट २०२६ रोजी अप. क्र. ३७४/२०२६, कलम ३०५(अ), ३३१(४) इठर अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास करून पोलिसांनी आरोपी निष्पन्न केला. दुर्गेश चुन्नीलाल गंगभोज (वय २६ वर्षे), रा. असईटोला, पोस्ट लटोरी, ता. सालेकसा, जि. गोंदिया यास पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपीकडून गुन्ह्यात चोरीस गेलेला गॅस शेगडी, तांब्याचा गुड, मिक्सर मशीन, जर्मन कढई, स्टील ग्लास, कुकर तसेच इतर साहित्य असा अंदाजे ६ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस दिनांक १९ ऑगस्ट २०२६ रोजी



सकाळी १०.४६ वाजता अटक करून न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे. ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे तथा उपविभागीय पोलीस अधिकारी नंदिनी चणकापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रवि नागोसे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

## न्यायालयाच्या लिपिक भरती परीक्षेत घोळ झाल्याचा पत्रकार परिषदेत आरोपः देवेंद्र हेडाऊ

### टंकलेखन चाचणी पुन्हा घेण्यात यावी, विद्यार्थ्यांची पत्रपरिषदेत न्यायासाठी धाव

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मुंबई उच्च न्यायालय व इतर खंडपीठांच्या लिपिक भरतीसाठी घेण्यात आलेल्या संगणक टंकलेखन परीक्षेत मोठ्या प्रमाणात घोळ झाल्याचा आरोप परीक्षार्थींनी केला आहे. लिपिकांच्या १,३३२ जागांसाठी १६ जुलै रोजी, ही परीक्षा घेण्यात आली होती. टंकलेखन परीक्षेला राज्यभरातून ११.३०५ परीक्षार्थी परीक्षेला बसले होते. यापूर्वी लिपिक भरतीची परीक्षा न्यायालय प्रशासनामार्फत घेण्यात येत होती. परीक्षार्थींना हार्ड कॉपी देऊन त्यातील मजकूर संगणकावर टंकलिखित करावा लागत होता. मात्र, यंदा प्रथमच स्क्रीन टू स्क्रीन पद्धतीने परीक्षा घेण्यात आली.



या पद्धतीत स्क्रीनवरील अक्षरांचा आकार लहान असल्याने स्वल्पविराम, अवतरण चिन्ह, विसर्ग यांसारखी चिन्हे स्पष्ट दिसत नसल्याची तक्रार परीक्षार्थींनी केली. त्याशिवाय उतारा टंकलिखित करतांना अक्षरे उशिराने स्क्रीनवर उमटत असल्याने टंकलेखनाच्या गतीवर परिणाम झाला. काही परीक्षा केंद्रांवरील की-बोर्डवर धूळ साचलेली होती, तर अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचे की- बोर्ड असल्याने ते व्यवस्थित कार्यरत नसल्याचा आरोप करण्यात आला.

टंकलेखन परीक्षेतील नियमही पाळले गेले नसल्याचा दावा जीसीसी- टीबीसी असोसिएशनचे अध्यक्ष देवेंद्र हेडाऊ यांनी केला. परीक्षेसाठी ४० शब्द प्रतिमिनिट गतीची अट असताना, उताऱ्यातील शब्दांची गणना केल्यास प्रत्यक्ष गती ५३.३२ शब्द प्रतिमिनिट इतकी होती. भंडारा जिल्ह्यातून परीक्षा दिलेल्या पल्लवी शेंडे म्हणाल्या की, तीन बॅचमध्ये परीक्षा होती. पहिल्या बॅचच्या विद्यार्थ्यांना केंद्रावर ११ ते ११.१५ पर्यंत पोहचायचे होते. विद्यार्थी १० वाजता पासून परीक्षा केंद्रावर पोहचले. मात्र नेटवर्कच्या समस्या, तांत्रिक त्रुटी यामुळे ५ वाजता. विद्यार्थी केंद्राबाहेर पडले. तर दुसऱ्या बॅचचे विद्यार्थी ६ वाजता. केंद्रावर गेले. तर तिसऱ्या बॅचची परीक्षाच झाली नाही.

**पुन्हा परीक्षा घेण्यात यावी**

परीक्षेच्या संदर्भात राज्यभरातून विद्यार्थ्यांमध्ये संताप व्यक्त होतोय. न्यायालयाने टंकलेखनाची पुनर्परीक्षा घ्यावी. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या धर्तीवर न्यायालय प्रशासनानेच ती आयोजित करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. पत्रकार परिषदेला उपस्थित देवेंद्र हेडाऊ, सारंग मौंदेकर, तेजस मोटघरे, प्रज्वल ताटे, पल्लवी शेंडे, सायली मसारे, राधा दहाले, प्रियंका काद्रेल, ऐश्वर्या मेश्राम, श्वेता टेंभुर्णे, अजित रडके, रजत सोंडावले आणि संकल्प लांजेवार यांची उपस्थिती होती.

## ओळीत पुनर्लागवड पद्धतीद्वारे वाढणार भात पिकाचे उत्पादन



**दै. सिंहवाणी वृत्त, काचुरवाही**

तालुक्यातील खोडगाव या गावात 'ओळीत पुनर्लागवड पद्धतीने भात पिकाची लागवड' हे कृषी विभागाच्या वतीने प्रात्यक्षिक राबविण्यात आले. आधुनिक व शाश्वत शेती पद्धतीचा प्रसार करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.तसेच शेतकरी गटातील शेतकऱ्यांना ओळीत पुनर्लागवड पद्धतीने भात लागवड करण्यासाठी प्रत्येकी आठ किलो 'पीडीकेव्ही तिलक' प्रमाणित भात व बांधवर लागवडीकरीता तूर बियाण्याचे वाटप करण्यात आले.तसेच उत्पादन वाढविणे, उत्पादन खर्च कमी करणे तसेच पाणी व खतांचा कार्यक्षम वापर करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे सहाय्यक कृषी अधिकारी श्री.ए.एम. माहोरे यांनी सांगितले. यावेळी ओळीत पुनर्लागवड पद्धतीचे महत्त्व, योग्य रोपांचे वय, लागवडीतील अंतर, पाणी व खत व्यवस्थापन तसेच तण नियंत्रण याबाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या पद्धतीमध्ये रोपांना पुरेसा सूर्यप्रकाश, हवा व अन्नद्रव्ये मिळाल्याने फुटव्यांची संख्या वाढते व उत्पादनात १० ते २० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले.

आधुनिक भात लागवडीबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. आगामी काळात अशाच उपक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा कृषी विभागाचा मानस असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. ओळीत पुनर्लागवड पद्धतीमुळे रासायनिक खतांचा कार्यक्षम वापर, १० ते १५ टक्क्यांपर्यंत खत बचत, २० ते ३० टक्के पाणी बचत, प्रभावी तण नियंत्रण, मजुरीत बचत तसेच अधिक उत्पादन मिळण्यास मदत होते. यामुळे शेती अधिक शाश्वत व किफायतशीर बनण्यास हातभार लागतो.

# संघटन मजबूत करण्यासाठी सलील देशमुखांचा तालुकानिहाय दौरा

### पदवीधर मतदार नोंदणीला गती, कार्यकर्त्यांची नवी फळी उभारण्यावर भर

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

सत्तेच्या काळात अनेकजण पक्षासोबत असतात; मात्र सत्ता बदलताच स्वार्थासाठी पक्षांतर करणाऱ्यांची संख्या वाढते. अशा परिस्थितीत पक्षाची खरी ताकद असलेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संघटना पुन्हा मजबूत करण्याची गरज आहे. पक्षाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी सक्षम आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांची नवी फळी उभारून मजबूत संघटनात्मक बांधणी करण्यावर भर देणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) चे नागपूर जिल्हाध्यक्ष सलील देशमुख यांनी स्पष्ट केले.

नागपूर जिल्हाध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर सलील देशमुख यांनी पक्ष संघटनेला नवसंजीवनी देण्यासाठी तालुकानिहाय बैठका व कार्यकर्ता संवाद सुरू केला आहे. जुन्या कार्यकारिणीची फेररचना करताना सक्रिय आणि पक्षाच्या विचारांशी बांधील असलेल्या कार्यकर्त्यांना संघटनेत संधी देण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. गावपातळीपासून जिल्हास्तरापर्यंत संघटना मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांच्या संपर्कात राहून स्थानिक प्रश्न आणि संघटनात्मक अडचणी जाणून घेतल्या जात आहेत.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पदवीधर मतदार नोंदणी अभियानाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. पक्षाने सलील देशमुख यांच्यावर नागपूर पदवीधर मतदारसंघातील मतदार नोंदणीसाठी समन्वयक म्हणून जबाबदारी सोपविली आहे. या अभियानाच्या अनुषंगाने त्यांनी पारशिवनी, रामटेक, मौदा, कामठी, काटोल आणि नरखेड तालुक्यांचा दौरा करून पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून नोंदणीचा आढावा घेतला.

बैठकांमध्ये तालुकानिहाय झालेली पदवीधर मतदार नोंदणी,



शिल्लक असलेली नोंदणी, पात्र मतदारांशी संपर्क आणि आगामी काळातील नियोजन यावर चर्चा करण्यात आली. प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या कार्यक्षेत्रातील पात्र पदवीधरांपर्यंत पोहोचून त्यांना मतदार नोंदणीसाठी मार्गदर्शन करावे, अशा सूचना देण्यात आल्या.

नागपूर जिल्ह्याबरोबरच पूर्व विदभार्तील गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांचाही दौरा करून पदवीधर मतदार नोंदणीचा तालुकानिहाय आढावा घेण्यात आला. शिल्लक राहिलेल्या तालुक्यांमध्ये तसेच पूर्व विदभार्तील इतर भागात लवकरच दौरे करून स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला जाणार आहे.

दरम्यान, जिल्हाध्यक्षांचा थेट तालुकानिहाय संपर्क दौरा ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांसाठी उत्साहवर्धक ठरत असून संघटनेत नवचैतन्य निर्माण झाले आहे. पक्षाची संघटनात्मक पकड अधिक मजबूत करण्यासाठी गावपातळीवर सक्रिय कार्यकर्त्यांचे जाळे उभे करण्यासोबतच जनसंपर्क वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. पदवीधर मतदार नोंदणी अभियान हे केवळ निवडणुकीपुरते मर्यादित न ठेवता सुशिक्षित तरुणांपर्यंत पक्षाचा विचार पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम बनवावे. प्रत्येक कार्यकर्त्याने जबाबदारी स्वीकारून एकदिलाने काम केल्यास पक्षाची संघटनात्मक ताकद निश्चितपणे वाढेल, असा विश्वास सलील देशमुख यांनी व्यक्त केला.

# राज्यातील ७० हजार सोसायट्यांच्या 'डीम्ड कन्व्हेअन्स'चा मार्ग मोकळा

### मालमत्ता पत्रक आणि सातबारावर थेट सोसायटीच्या नावाची नोंद होणार, स्वयंपुनर्विकासासाठी प्रोत्साहन आणि कर सवलतींची अंमलबजावणी, गृहनिर्माण संस्थांचा स्वयंपुनर्विकास व प्रलंबित प्रश्नांबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे धोरण निश्चितीचे आदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

राज्यातील लाखो सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या (हाऊसिंग सोसायट्या) स्वयंपुनर्विकास प्रक्रियेतील प्रलंबित प्रश्न आणि महसूल विभागाशी संबंधित सवलतींची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अत्यंत सकारात्मक पावले उचलली आहेत. यासंदर्भात विविध धोरणे निश्चित करून अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत.



मंत्रालयात महसूलमंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष बैठकी झाली. आमदार प्रवीण दरेकर,आमदार संजय केळकर उपस्थित होते. या बैठकीत सोसायट्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्यांवर सविस्तर चर्चा होऊन महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

**स्वयंपुनर्विकासातील अडथळे दूर होणार**

सध्या अनेक संस्था युडीसीपीआर मध्ये समाविष्ट नसल्याने त्यांच्या स्वयंपुनर्विकासात अडचणी येत आहेत, ही संपूर्ण राज्याची परिस्थिती आहे. यावर तोडगा काढण्यासाठी २०१९ च्या शासन निर्णयानुसार इतर करांमध्ये सवलत देण्याचे आणि १० टक्के प्रोत्साहन (इन्सेन्टिव्ह) देण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत. तसेच, स्वयंपुनर्विकासासाठी 'वर्क कॉन्ट्रॅक्ट' आणि 'डेव्हलपमेंट अँग्रीमेंट' बाबतचा सुटसुटीत मसुदा तयार करून देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. फायनान्स विभागाकडून ४ टक्के सवलत मिळणे आवश्यक असून, त्यासाठी गृहनिर्माण विभागाने त्वरित प्रस्ताव सादर करावा आणि नोंदणी महानिरीक्षकांकडून याबाबत स्पष्टता आणावी, असे निर्देशही बैठकीत देण्यात आले.

**डीम्ड कन्व्हेअन्स प्रक्रियेला गती आणि सुलभता**

राज्यात सध्या सुमारे १ लाख १५ हजार नोंदणीकृत सोसायट्या असून, त्यापैकी तब्बल ६० ते ७० हजार सोसायट्यांचे अद्याप 'डीम्ड कन्व्हेअन्स' झालेले नाही. सहकार, महसूल, जमाबंदी आणि आयजीआर विभागांच्या समन्वयाने ही प्रक्रिया राबविली जाणार आहे. नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांच्या मालमत्ता पत्रकावर (प्रॉपर्टी कार्ड) किंवा सातबारा उताऱ्यावरील इतर हक्कांमध्ये आता थेट सोसायटीच्या नावाची नोंद करण्यात यावी, अशा सूचना महसूलमंत्र्यांनी केल्या आहेत.

**म्हाडा सोसायट्या आणि युएलसीबाबत निर्णय**

म्हाडामधील सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी शासनाने अकृषिक कर यापूर्वीच रद्द केला आहे. तरीही काही ठिकाणी तो वसूल केला जात असल्याच्या बाबीकडे लक्ष वेधण्यात आले. यासोबतच इमारतींमधील नागरी कमाल जमीन धारणा आरक्षित असलेल्या सदनिकांबाबत योग्य कार्यपद्धती निश्चित करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

## थोडक्यात

### डॉ. सावन धर्मपुरीवार 'राष्ट्रीय नवोदयनन पुरस्कारा'ने सन्मानित

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

कला, मानवविद्या, भाषा व साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत डॉ. सावन गिरिधर धर्मपुरीवार यांना 'नॅशनल नवोदय पुरस्कार २०२६' या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय सन्मानाने गौरविण्यात आले. केंद्र शासनाद्वारे संचालित जवाहर नवोदय विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या 'नवसंवाद फाऊंडेशन जे.एन.व्ही. इंडिया'च्यावतीने कला, मानवविद्या, भाषा व साहित्य या श्रेणीत त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. डॉ. धर्मपुरीवार हे जवाहर नवोदय विद्यालय, नागपूरचे माजी विद्यार्थी असून रामटेक येथील विद्यासागर कला महाविद्यालयात मागील २२ वर्षांपासून इंग्रजी विषयाचे प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. इंग्रजी व मराठी विषयाचे संशोधक, साहित्यिक आणि प्रभावी सूत्रसंचालक म्हणून त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजीचे अध्यापन करताना त्यांनी शिक्षण, भाषा, साहित्य व मानवविद्या क्षेत्रात सातत्यपूर्ण योगदान दिले आहे.



त्यांची मराठी व इंग्रजी भाषेतील एकूण नऊ पुस्तके प्रकाशित झाली असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांत त्यांचे संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन व विदर्भ साहित्य संमेलनात त्यांनी निमंत्रित कवी व कथाकार म्हणून सहभाग घेतला आहे. यापुर्वीही त्यांच्या कार्याची दखल घेत रा. तु. म. नागपूर विद्यापीठाने २०२१ मध्ये त्यांना उत्कृष्ट शिक्षक-लेखक पुरस्कार, तर मराठी वाङ्मय परिषद, बडोदा यांनी २०१४ मध्ये उत्कृष्ट कथासंग्रहासाठी अभिरुची गौरव पुरस्कार प्रदान केला आहे. दरवर्षी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जवाहर नवोदय विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांना हा सन्मान प्रदान केला जातो. यावर्षी भारतभरातील जवाहर नवोदय विद्यालयांच्या माजी विद्यार्थ्यांमधून २६ जणांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. सप्टेंबर महिन्यात पुणे येथे 'नवसंवाद फाऊंडेशन जे.एन.व्ही. इंडिया' च्या वतीने आयोजित एका समारोहात त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. हा राष्ट्रीय सन्मान अधिक समर्पणाने कार्य करण्याची प्रेरणा देणारा असल्याचे डॉ. धर्मपुरीवार यांनी सांगत नवसंवाद फाऊंडेशनच्या निवड समितीचे आभार मानले. त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

### १५ ऑगस्टची ग्रामसभा झालीच नाही? पूर्वसूचनेअभावी आमडी-हिवरी ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

पारशिवनी तहसील अंतर्गत येणाऱ्या गट ग्रामपंचायत आमडी-हिवरी येथे १५ ऑगस्ट २०२६ रोजी नियोजित ग्रामसभेबाबत ग्रामस्थांमध्ये संभ्रम आणि नाराजी निर्माण झाली आहे. ग्रामसभा नियमानुसार झाली नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत असून, याप्रकरणी चौकशी करण्याची मागणीही पुढे आली आहे. ग्रामसभेबाबत ग्रामस्थांना पूर्वसूचना देणे अपेक्षित असताना ग्रामपंचायतीकडून दवंडी देण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच १५ ऑगस्टच्या सकाळपर्यंत गावातील नोटीस बोर्ड अथवा प्रमुख सार्वजनिक ठिकाणी ग्रामसभेबाबत सूचना लावण्यात आली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या प्रकारामुळे ग्रामपंचायत सचिव सचिन हिरापुरे, सरपंच इंद्रपाल मायवाडे आणि उपसरपंच योगेश बसुले यांच्या कार्यपद्धतीवर ग्रामस्थांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.




ग्रामसभा ही गावातील विकासकामे, निधी, शासकीय योजना आणि ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत ग्रामस्थांना माहिती देणारी महत्त्वाची वैधानिक प्रक्रिया आहे. त्यामुळे ग्रामसभेची पूर्वसूचना न मिळणे किंवा नियोजित ग्रामसभा न होणे हा ग्रामस्थांच्या सहभागाच्या अधिकाराशी संबंधित गंभीर मुद्दा असल्याचे सांगितले जात आहे. या संपूर्ण प्रकाराची चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. दरम्यान, ग्रामपंचायत सचिव सचिन हिरापुरे यांनी ग्रामसभेबाबत संपर्क केले असता आपली भूमिका मांडली आहे. दवंडी देण्यात आली आहे. नियोजित ग्रामसभा २१ ऑगस्ट रोजी होणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, दवंडी देण्यात आलेली नाही. १५ ऑगस्ट रोजी ग्रामसभा झाली नसून ग्रामस्थांच्या अधिकाराचे हनन झाले आहे, असा आरोप शिवसेनेचे पारशिवणी तालुका प्रमुख राजू भोस्कर यांनी केला आहे.

### एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत पारधी सखी व समन्वयक पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जिल्ह्यातील पारधी समाजबांधवांना सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी, महिला व बालकांचे आरोग्य विषयक कार्य आणि पारधी समाजास शासनाच्या वेगवेगळ्या योजनांचा लाभ मिळावा याउद्देशाने पारधी समाजातीलच सुशिक्षीत २० महिला पारधी सखी व ४ पुरुष यांची तालुका पारधी समन्वयक या पदासाठी मानधनतत्वावर दहा महिण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करायाची आहे. समाज सेवेची आवड असलेल्या इच्छूक, गरजू व पात्र पारधी समाजातील उमेदवारांनी या योजनेचा लाभ घेण्याकरीता या कार्यालयात अथवा तालुकास्तरावर असलेल्या शासकिय आदिवासी वसतीगृहात दिनांक २६ ऑगस्टपर्यंत विहित नमुन्यातील अर्ज कागदपत्रासह सादर करावे, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी उमेश काशिद यांनी केले आहे. पारधी गावातील महिला व बालकांच्या आरोग्य विषयक कार्य करण्यासाठी पारधी सखींची नियुक्ती - या अंतर्गत नागपूर जिल्यालितील लगतचे दोन पारधी बेड्यासाठी प्रत्येकी १ प्रमाणे २० महिलांची नेमणूक करावयाची आहे. पारधी गावातील लाभार्थ्यांना शासनाच्या वेगवेगळ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी पारधी समन्वयक नियुक्ती - या योजनेंतर्गत उमरेड-भिवापूर, कळमेश्वर-काटोल, सावनेर-नरखेड, नागपूर-हिंगणा अशा प्रत्येकी दोन तालुक्यासाठी १ या प्रमाणे ४ पुरुषांची नेमणूक करावयाची आहे.

## राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते सलाम किसान कृषी ड्रोन सेवा व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रामटेक येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शॉपिंग मॉलमध्ये सलाम किसान कृषी ड्रोन सेवा व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन कृषि राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सचिन किरपान, सलाम किसान चे धनश्री मंधानी, परीक्षित राजुरकर, भुवनेंद्र भाटी, सुमित मुंगले, ड्रोन पायलट साहिल खेलकर, मुकेश नागदेवते,राजकुमार खोब्रागडे, प्रशांत भुरे, भगवान गोंगले, आदेश नाटकर उपस्थित होते.



याप्रसंगी आशिष जयस्वाल उपस्थित शेतकऱ्यांना संबोधित करतांनी म्हणाले, "शेतकऱ्यांच्या शेतीतील उत्पादन खर्च कमी करून त्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर व्हावा, हे माझे सातत्याने स्वप्न आणि प्रयत्न राहिले आहेत. त्याच दिशेने कृषी क्षेत्रात ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याचा हा एक महत्त्वाकांक्षी आणि पथदर्शी उपक्रम आहे.

आज शेतकऱ्यांना पिकांवर अनेक वेळा औषधांची फवारणी करावी लागते. त्यासाठी मोठ्या प्रमाणात वेळ, श्रम, पाणी आणि पैसा खर्च होतो. अनेकदा मजुरांची उपलब्धता, फवारणीसाठी लागणारा वेळ आणि वाढता उत्पादन खर्च ही मोठी आव्हाने असतात. ड्रोनच्या माध्यमातून ही फवारणी अधिक अचूक, कमी वेळेत आणि कमी खर्चात करता येणार आहे.

या उद्देशाने जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून ५० कृषी ड्रोन ९० टक्के अनुदानावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेताना त्याची अंमलबजावणी पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण होणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेत मी स्वतः लक्ष घातले असून, ड्रोनची गुणवत्ता, सुविधा, प्रशिक्षण, विमा आणि देखभाल याबाबत स्वतंत्र SOP (Standard Operating Procedure) तयार करून त्यानुसार काम करण्यात येणार आहे. या ड्रोनच्या माध्यमातून फक्त १० लिटर द्रावणामध्ये जवळपास एक एकर क्षेत्राची फवारणी करता येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा फवारणीवरील खर्च, वेळ आणि श्रम निश्चितच कमी होण्यास मदत होईल.

याशिवाय 'Dial for Drone' या सुविधेच्या माध्यमातून ज्या शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे फवारणीची आवश्यकता असेल, त्यांना मागणीनुसार ही सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या ड्रोनमध्ये अक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असल्याने पिकांवरील संभाव्य रोगप्रादुभार्वाची पूर्वकल्पना घेऊन आवश्यक त्या ठिकाणी वेळेत उपाययोजना करता येणार आहेत. म्हणजेच रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाल्यानंतर फवारणी करण्याऐवजी, योग्य वेळी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची संधी शेतकऱ्यांना मिळणार आहे. यामुळे अनावश्यक फवारण्या कमी होतील आणि उत्पादन खर्चातही बचत होईल.

या उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या ड्रोनसोबत आवश्यक सुविधा आणि सुरक्षिततेलाही प्राधान्य देण्यात आले आहे. चार अतिरिक्त बॅटरी, आठ अतिरिक्त प्रोपेलर, तीन नोजल, तीन अतिरिक्त टँक, अनिवार्य इन्शुरन्स, रिपेअरिंग किट तसेच दोन वर्षांचा Annual Maintenance Support देण्यात येणार आहे. त्यासोबत ड्रोन ऑपरेशनचे आवश्यक प्रशिक्षणही दिले जाणार आहे.

## एकलव्य एकल विद्यालय शिक्षक-पथप्रदर्शक प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन आज

### आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांची उपस्थिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्यावतीने आयोजित चार दिवसीय एकलव्य एकल विद्यालय शिक्षक-पथप्रदर्शक प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन गुरुवार, २० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वाजता सती अनुसया माता देवस्थान, पारडसिंगा, ता. काटोल, जि. नागपूर येथे होणार आहे.

कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत संघचालक दीपकराव तामशेट्टीवार, महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्री ना. अशोक उईके, आमदार चरणसिंग ठाकूर आणि संस्थेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

हे प्रशिक्षण वर्ग २० ते २३ ऑगस्टदरम्यान होणार असून, विदर्भातील दुर्गम, आदिवासी तसेच नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याच्या संस्थेच्या कायार्ला अधिक प्रभावी दिशा देण्यासाठी त्याचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, २१ ऑगस्ट रोजी दुपारी ३ ते ४ वाजता रा. स्व. संघाचे विदर्भ प्रांत कार्यवाह अतुल मोघे पंच परिवर्तन या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर सायंकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत गडचिरोलीचे प्रकाश गेडाम जनजागरण या विषयावर मार्गदर्शन करतील.

शनिवार, २२ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता ओडिशाचे किरण व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. सायंकाळी ६.३० वाजता प. पू. जितेंद्रनाथ महाराज, पीठाधीश्वर, श्री देवनाथ मठ, अंजनगावसुर्जी, जि. अमरावती यांचे आशीर्वचन होणार आहे.

**२३ रोजी प्रशिक्षण वर्गाचा समारोप**

रविवार, २३ ऑगस्ट रोजी ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता अनुभव कथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षण वर्गाचा समारोप सायंकाळी ६ वाजता होणार आहे. केंद्रीय मंत्री तसेच संस्थेचे प्रेरणास्त्रोत व मार्गदर्शक नितीन गडकरी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी महावीर महात्मा पुरस्कारप्राप्त व जयगंगा कोचिंग (ओ.पी.सी.) प्रा. लि., ओडिशाचे संस्थापक किरण यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

## सोनोग्राफी केंद्रात लिंग निदान होत असल्याबाबत माहिती देणाऱ्या व्यक्तीस १ लाखाचे बक्षीस : डॉ. निवृत्ती राठोड

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जिल्ह्यातील सोनोग्राफी केंद्रात लिंग निदान होत असल्यास त्याबाबत माहिती देणाऱ्या व्यक्तीस प्रोत्साहनासाठी खबरी योजनेंतर्गत केस दाखल झाल्यास एक लाखाचे बक्षीस देण्यात येणार असल्याचे जाहीर आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड यांनी केले. याबाबत तक्रार करण्यासाठी www.amchimulgi.gov.in या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर तक्रार करावी. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. जिल्हा सल्लागार समितीची बैठक जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयात घेण्यात आली. या बैठकीत ४ नवीन, ३ नोंदणी नूतनीकरण व १ सोनोग्राफी केंद्र बंद करण्यात आले. यासोबत १ सोनोग्राफी केंद्राने कायद्याची अंमलबजावणी केली नसल्याचे निदर्शनास आल्याने त्याची मान्यता पुढील आदेशापर्यंत निलंबित करण्यात आली.

या बैठकीमध्ये वारंवार होणारे डॉक्टरांचे नावे समाविष्ट व रद्द करण्यावर किमान ६ महिन्याची मयार्दा असावी, असा निर्णय सवार्नुमते घेण्यात आला. गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व (लिंग निदान) अधिनियम १९९४ या कायद्याची अंमलबजावणी न करणाऱ्या सोनोग्राफी केंद्रांविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी व त्यांना कठोर शिक्षा व्हावी यासाठी न्यायालयात अधिकाधिक प्रयत्न करण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

## 'मंथन 4 युवा'मध्ये चित्रकला, नृत्य व शैक्षणिक स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद





**आज 'मंथन 4 युवा' मध्यम**

उद्या, २१ ऑगस्ट रोजी 'मंथन 4 युवा' अंतर्गत शालेय स्तरावरील भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत २,००० हून अधिक शालेय विद्यार्थी सहभागी होणार आहेत. स्पर्धेचे आयोजन सायी सभागृह, माउंड रोड येथे करण्यात येणार असून, युथ समिट अंतर्गत हा उपक्रम घेण्यात येत आहे.

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

'मंथन 4 युवा - नागपूर २०२६' अंतर्गत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व सर्जनशीलतेला व्यासपीठ देण्यासाठी चित्रकला, समूह नृत्य आणि शैक्षणिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विविध शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या युवा-केंद्रित दृष्टिकोनातून आयोजित 'मंथन4युवा' अभियानांचे आयोजन करण्यात आले आहे. आज विविध स्पर्धांचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात आयोजन करण्यात आले.

चित्रकला स्पर्धेला आमदार प्रवीण दटके, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महानगर संघसंचालक राजेश लोहिया, महाराष्ट्र टाईम्सचे संपादक अतुल पांडे, ज्येष्ठ कलावंत चंद्रकांत चन्ने, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयाचे विभागप्रमुख संजय जठार, डॉ. सचिन हजारे, प्रफुल्ल नायसे, राजकुमार कनाडे, व श्रीकांत गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. विनोद चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. स्पर्धेसाठी ३४६ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन व ऑफलाइन नोंदणी केली होती. त्यापैकी २६० विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.

जनमंचच्या वतीने आयोजित आंतरशालेय व आंतरमहाविद्यालयीन समूह नृत्य स्पर्धेत एकूण १३० शैक्षणिक संस्थांनी सहभाग घेतला. इयत्ता ५वी ते ८वीच्या अ गटात ४५ शाळा, ९वी ते १२वीच्या ब गटात ३७ शाळा, तर पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या क गटात ४८ महाविद्यालये सहभागी झाली. विद्यार्थ्यांनी लोक, पारंपरिक व सर्जनशील नृत्यप्रकार सादर करून सांस्कृतिक अभिव्यक्तीचे दर्शन घडविले.

मंथन फेस्टअंतर्गत शैक्षणिक स्पर्धांनाही चांगला प्रतिसाद मिळाला. ९वी ते १२वीच्या गटात ३९ नोंदणींपैकी ३६ विद्यार्थी, तर पदवी व पदव्युत्तर गटात ८६ नोंदणींपैकी ४५ विद्यार्थी सहभागी झाले. या उपक्रमांचे संयोजक विष्णु चांगदे व रितेश गावंडे होते. प्रकाश शुक्ला समन्वयक होते. स्वप्निल खरे, नितीन मरसकोले, प्रणोती बागडे, नलिनी वंजारी, शुभांगी सोनी, मीनल कसनारे व कांचन टेकाडे यांनी सहकार्य केले.

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : गुरूवार, २० ऑगस्ट २०२६

# भूमिकेशी प्रामाणिक राहणे हेच कलाकाराचे काम; यश-अपयश प्रेक्षकांच्या हाती : अशोक सराफ

## 'दिलखुलास गप्पां'मध्ये ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी उलगडला प्रदीर्घ कलाप्रवास

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कलाकाराने कोणतीही भूमिका साकारताना त्या पात्राचा स्वभाव, मानसिकता आणि प्रसंगानुरूप वर्तणूक समजून घेणे आवश्यक आहे. भूमिका एखाद्या व्यक्तिमत्त्वाशी साधर्म्य साधत असली, तरी त्याचा विचार न करता पात्राशी प्रामाणिक राहून अभिनय करणे हेच कलाकाराचे खरे काम आहे. आपल्याला राजकारणाचे फारसे ज्ञान नसतानाही राजकीय पार्श्वभूमीची भूमिका केवळ पात्राचा स्वभाव आणि प्रसंग समजून साकारला आणि त्यासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाल्याची आठवण ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी सांगितली.

नागपूर महानगरपालिका, श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट आणि विदर्भ गौरव प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी सिव्हिल लाइन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात दिलखुलास गप्पा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पुष्कर श्रोत्री यांनी अशोक सराफ यांच्याशी साधलेल्या संवादातून त्यांच्या प्रदीर्घ कलाप्रवासातील अनेक आठवणींना उजाळा मिळाला.

राजकीय व्यक्तिरेखा साकारण्याच्या अनुभवाबद्दल बोलताना सराफ म्हणाले, मी राजकारणी नाही आणि मला राजकारणातलं फारसं काही



### अशोक सराफ यांच्या अभिनयाने मराठी चित्रपटसृष्टीला नवी दिशा : मुख्यमंत्री

विनोदाला सहजता, अभिनयाला नैसर्गिकता आणि प्रत्येक भूमिकेला स्वतंत्र ओळख देत अशोक सराफ यांनी मराठी चित्रपटसृष्टीला नवी दिशा दिली. विनोदी भूमिकांइतक्याच ताकदीने त्यांनी गंभीर व्यक्तिरेखाही साकारल्या. त्यामुळे अशोक सराफ हे केवळ उत्तम अभिनेतेच नव्हे, तर संवेदनशील माणूस म्हणूनही श्रेष्ठ आहेत, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. अशोक सराफ यांच्या ८०व्या वर्षात पदार्पणानिमित्त नागपूर महानगरपालिका, श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट आणि विदर्भ गौरव प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी सिव्हिल लाइन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात भव्य नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते अशोक सराफ यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ८० दिव्यांनी त्यांचे औक्षण करण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अशोक सराफ यांच्या अभिनयाची सर्वात मोठी वैशिष्ट्ये म्हणजे त्यातील सहजता आणि नैसर्गिकता. त्यांनी विनोदी भूमिकांमधून प्रेक्षकांना खळखळून हसवले, मात्र त्यांची प्रतिभा केवळ विनोदी भूमिकांपुरती मर्यादित राहिली नाही. विविध प्रकारच्या गंभीर आणि आशयपूर्ण भूमिका साकारून त्यांनी आपल्या अभिनयाची व्यापकता सिद्ध केली. धुमधडाका, बनवाबनवी यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या भूमिका आजही रसिकांच्या स्मरणात आहेत. या भूमिकांनी केवळ मनोरंजन केले नाही, तर मराठी चित्रपटसृष्टीतील विनोदी अभिनयाला वेगळी उंची मिळवून दिली. त्यांच्या अभिनयातील टायमिंग, संवादफेक आणि प्रसंगानुरूप देहबोली यामुळे प्रत्येक व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या मनात ठसली, असे फडणवीस यांनी सांगितले.

कळत नाही. मात्र, पात्र कसं लिहिलं आहे, ते कसं वागेल आणि ज्या प्रसंगात आहे, त्या प्रसंगाला त्याची प्रतिक्रिया काय असेल, याचा विचार केला. त्यानुसार भूमिका प्रामाणिकपणे साकारली. ती एखाद्या राजकारण्याशी जुळत असेल, तर मला त्याची कल्पना नाही. मात्र, त्या भूमिकेसाठी मला बेस्ट अँक्टरचा अवॉर्ड मिळाला. पात्राची पार्श्वभूमी किंवा ते कोणाशी साधर्म्य साधते, यापेक्षा लेखकाने निर्माण केलेले पात्र समजून घेऊन ते पडद्यावर नैसर्गिकपणे उभे करणे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

चित्रपटाच्या यश-अपयशाचा कलाकारावर होणारा परिणाम हा त्याची कलाकृतीशी असलेली नाळ आणि कामाप्रतीची निष्ठा यावर अवलंबून असतो, असेही सराफ यांनी सांगितले. एखादा चित्रपट मनापासून आणि पूर्ण प्रामाणिकपणे केल्यानंतर तो प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला नाही, तर निश्चितच वाईट वाटते. हे लोकांना आवडायला पाहिजे होतं; पण आवडलं नाही, अशी खंत निर्माण होते. मात्र, प्रत्येक कलाकाराची प्रतिक्रिया वेगळी असते. काही जण अपयश फारसे मनावर घेत नाहीत, तर आपल्या कामाशी आणि प्रेक्षकांशी प्रामाणिक असलेल्या कलाकारांना अपयशाची अधिक खंत वाटते, असे त्यांनी नमूद केले.

भूमिका साकारण्यापूर्वी ती कठीण वाटणे स्वाभाविक असते; मात्र योग्य अभ्यास आणि प्रयत्नांनी ती सुलभ होते. शेकडो नाटके आणि प्रयोग केल्यानंतरही रंगमंचावर पहिली एन्ट्री घेताना आजही काही प्रमाणात भीती आणि दडपण जाणवते. मात्र, एकदा प्रवेश करून काम सुरू झाले की ते नाहीसे होते. सुरुवातीची ही धाकधूक कलाकारासाठी सकारात्मक आणि आवश्यक असते. तीच कलाकाराला आपल्या कामाशी आणि भूमिकेशी प्रामाणिक राहण्यास मदत करते, असे त्यांनी सांगितले.

आपल्या गायकीच्या प्रवासातील एक रंजक आठवणही सराफ यांनी सांगितली. वास्तविक मी काही गायक नाही. पण दिवंगत संगीतकार आनंद मोडक यांनी मला एका गाण्यासाठी आग्रह केला. गाणं खराब होईल या भीतीने मी सुरुवातीला नकार दिला. मात्र, आनंद मोडक म्हणाले, हे गाणं गायकाचं नसून एका नटाचं गाणं आहे. त्या गाण्यात लहान मुलाला खेळवताना नटाला वेगवेगळ्या आवाजाच्या आणि चेहऱ्याच्या पट्या बदलाव्या लागत होत्या. त्यांचा हा दृष्टिकोन मला पटला आणि मी ते गाणं गायलं, अशी आठवण त्यांनी सांगितली.

अभिनयात एखाद्या पात्राला जिवंत करण्यासाठी त्याचे सूक्ष्म बारकावे शोधणे आवश्यक असल्याचे सराफ यांनी स्पष्ट केले. जगातील प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव आणि प्रकृती वेगळी असते. हीच वेगळी वैशिष्ट्ये शोधून ती भूमिकेत उतरवणे कलाकारासाठी महत्त्वाचे आहे. वरवरचा अभिनय केल्यास पात्र जिवंत न वाटता केवळ एक निर्जीव 'ठोकळा' वाटू शकतो, असे त्यांनी सांगितले.

कलाकाराच्या हातात केवळ आपले काम असते; त्याच्या यशाचा अंतिम निर्णय मात्र प्रेक्षकांच्या हाती असतो. 'आपल्यावर जेवढं अवलंबून आहे, तेवढं लोकांवर जास्त अवलंबून आहे. आपण काही करू शकत नाही, कारण शेवटी समोर आहेत ते प्रेक्षक,' असे सराफ यांनी स्पष्ट केले.

त्यांच्या या मनमोकळ्या संवादाला उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अभिनयातील प्रामाणिकपणा, भूमिकेचा सखोल अभ्यास आणि प्रेक्षकांच्या निर्णयाचा स्वीकार या त्रिसूत्रीतून अशोक सराफ यांच्या प्रदीर्घ कलाप्रवासाचा अनुभव उपस्थितांसमोर उलगडला.

थोडक्यात

## अरोलीचे ठाणेदार राऊत यांना निरोप तर रुजू झालेले ठाणेदार गोमासे यांचे स्वागत



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

अरोली पोलीस स्टेशन येथे ठाणेदार स्नेहल राऊत यांची शासकीय बदली स्थानिक गुन्हे शाखेत झाल्याने त्यांना भेटवस्तू देऊन निरोप देण्यात आला. अरोली परिसरात त्यांनी बजावलेल्या कर्तव्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करून त्यांच्या पुढील शासकीय सेवेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. तर स्थानिक गुन्हे शाखेतून अरोली पोलीस स्टेशन मध्ये रुजू झालेले नवनियुक्त ठाणेदार सागर गोमासे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, तालुका समन्वय समिती सदस्य नरेश बावनकुळे, अरोली पंचायत समिती गणातील भाजप नेते विष्णू देशमुख, बोरी घिवारी सरपंच विशाल सेलोकर, बेरडेपार सरपंच रेवाराम देशमुख, जिल्हा युवा मोर्चा मंत्री निलेश बावनकुळे उपस्थित होते.

## श्री स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूलमध्ये स्प्लॅश एरियाचा शुभारंभ



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

१५ ऑगस्ट २०२६ : स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून रिसामा (आमगाव) येथील श्री स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूलमध्ये प्री-प्रायमरीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष तयार करण्यात आलेल्या स्प्लॅश एरियाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरणात पोहण्याचे प्राथमिक प्रशिक्षण तसेच जलक्रीडेचा आनंद मिळावा, या उद्देशाने हा छोटेखानी वॉटर पूल परिसर विकसित करण्यात आला आहे. या स्प्लॅश एरियाचे उद्घाटन गीता देवी कलंत्री, डॉ. भाग्यश्री वालके, डॉ. जितेंद्र वालके आणि विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती स्मृती छपरिया यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्री-प्रायमरी विभागातील शिक्षक, विद्यार्थी तसेच मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापिका स्मृती छपरिया यांनी उपस्थित पालकांना स्प्लॅश एरियाची वैशिष्ट्ये, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी करण्यात आलेल्या उपाययोजना तसेच पोहण्याच्या प्रशिक्षणाची माहिती दिली. लहान वयातील विद्यार्थ्यांना खेळातून शिकण्याची संधी मिळावी आणि त्यांच्यामध्ये शारीरिक सक्रियतेची आवड निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

स्प्लॅश एरियाच्या शुभारंभामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. जलक्रीडेचा आनंद घेताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह आणि आनंदाचे वातावरण दिसून आले. विद्यालयाच्या या अभिनव उपक्रमाचे पालकांनी उत्स्फूर्त स्वागत करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान न देता त्यांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासालाही चालना देण्यासाठी विद्यालयाकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सुरू करण्यात आलेला स्प्लॅश एरिया विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि उपयुक्त ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## योग परिवाराची व्यसनमुक्त भारत घडवण्याची प्रतिज्ञा

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

भारत सरकारच्या नवी दिल्ली येथील सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय आणि अमली पदार्थ नियंत्रण ब्युरो (एनसीबी)



यांच्या सहकार्याने भारत सरकार देशभरातील १० कोटी नागरिकांना व्यसनमुक्त जीवन जगण्याची प्रतिज्ञा घेण्यास प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने, ६ ते २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत "१० कोटी व्यसनमुक्ती प्रतिज्ञा महाअभियान" आयोजित करत आहे. या मोहिमेद्वारे, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि विविध सरकारी व खाजगी संस्थांमध्ये व्यसनमुक्तीबद्दल जनजागृती केली जात आहे, तसेच राजयोग ध्यानाच्या माध्यमातून सकारात्मक आणि तणावमुक्त जीवनासाठी प्रेरणा दिली जात आहे. या संदर्भात, प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय केंद्र, सावनेरच्या संचालिका ब्रह्मकुमारी सुरेखा दीदी यांच्या नेतृत्वाखाली, ब्रह्मकुमारी विश्व विद्यालय, सावनेरचे मोरेश्वर मोरे यांनी शहरातील एकमेव तहसील कार्यालयात आयोजित नियमित योग वगार्ला भेट दिली.व योग परिवार सावनेर च्या सर्व साधकांना व्यसनमुक्त भारत मोहिमेची सविस्तर माहिती दिल्यानंतर उपस्थित योगसाधकांना व्यसनमुक्त भारत मोहिमेत सहभागी होण्याचे व सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले व त्यांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. याप्रसंगी योग परिवार सावनेरचे संस्थापक व ज्येष्ठ योग शिक्षक किशोर धुंडेले, रमेश दरवई, कविता पिसे, संजय मानकर, डॉ. प्रमोद डोंगरे, अशोक आठवले, लताताई ढवळे, पद्मा नाचणकर, अरविंद कुशवाह, मुरलीधर किनकर, ओम नगराळे,मोरेश्वर थेरे, जयेंद्र नागराळे आदी उपस्थित होते. बागडे, सुमन तभाणे, आशा धुंडेले, रेखा बोरकर, दीपाली नारेकर,गायधने ताई,हनवतेताई, हेमा भैसारे, शिल्पा पिसे, अनिता नगराळे, डोंगरे मँडम, कविता नगराळे, सीमा सरोदे, किनकर ताई, वनिता डांगरे, सुदर्शन नारनावरे, सुनीता सहारे, कविता गजभीये यांच्यासह अनेक अभ्यासक उपस्थित होते.

## वृक्षारोपण व स्नेहमेळाव्याच्या माध्यमातून इनर व्हील क्लब ऑफ नागपूरचा पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इनर व्हील क्लब ऑफ नागपूरच्या अध्यक्षा पूजा साओजी यांच्या नेतृत्वाखाली नागपूरच्या कापसी येथील आनंद वाटिका ज्येष्ठ नागरिक निवासस्थानी वृक्षारोपण आणि सामुदायिक स्नेहमेळाव्याचा अर्थपूर्ण उपक्रम उत्साहात पार पडला.

या प्रकल्पाचे नेतृत्व प्रकल्प संचालक डॉ. माधुरी वाघ यांनी केले. या उपक्रमात इनर व्हील क्लबच्या सदस्या, ज्येष्ठ नागरिक तसेच ज्येष्ठ डॉक्टर सहभागी झाले. पर्यावरण संवर्धनासोबतच ज्येष्ठ नागरिकांशी संवाद, आपुलकी आणि स्नेहपूर्ण सहवासाचा सुंदर अनुभव या सकाळच्या कार्यक्रमातून मिळाला.

या उपक्रमांतर्गत एकूण २४ रोपांची लागवड करण्यात



आली. यामध्ये १० आंब्याची, १ अंजीराचे, ८ चाफ्याची, ४ चंदनाची आणि १ फणसाचे रोप यांचा समावेश होता. वृक्षारोपणातून केवळ झाडे लावण्याचा उपक्रम न राहता त्यांचे संगोपन, पर्यावरणाचे संरक्षण आणि भावी पिढ्यांसाठी हिरवेगार व निरोगी वातावरण निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे नेतृत्व अध्यक्षा पूजा साओजी यांनी केले. त्यांना डॉ. माधुरी वाघ, डॉ. भाग्यलक्ष्मी राजन, डॉ. खानझोडे, डॉ. विजयांती सुभेदार, विजयांती जवाडेकर, डॉ. कल्पना दासगुप्ता, डॉ. दीप्ती जैन तसेच श्री. व सौ. बापट यांचे सक्रिय सहकार्य लाभले. आनंद वाटिकेतर्फे श्री. टापडिया आणि श्री. बांग यांनी मोलाची मदत केली, तर डॉ. हेमंत वाघ यांनीही या उपक्रमाला सहकार्य व पाठिंबा दिला. ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती आणि उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा वृक्षारोपण उपक्रम अधिकच विशेष आणि संस्मरणीय ठरला. झाडे लावण्याच्या या उपक्रमातून विविध पिढ्यांमधील आपुलकी, काळजी, अनुभव, ज्ञान आणि सामाजिक जबाबदारीची देवाणघेवाण यांचे सुंदर प्रतीक साकार झाले. या कार्यक्रमातून एक साधा, पण अत्यंत प्रभावी संदेश देण्यात आला. 'आज झाडे लावूया, आज नाती जपूया आणि उद्याचा सुंदर भविष्यकाळ घडवूया.'

इनर व्हील क्लब ऑफ नागपूर सेवा, पर्यावरण संवर्धन आणि समाजातील अर्थपूर्ण स्नेहबंध यांचा सुंदर संगम घडवून आणणारे उपक्रम सातत्याने राबवत आहे. या उपक्रमातून पर्यावरणाप्रती जबाबदारी जपत समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचा क्लबचा प्रयत्न अधोरेखित झाला.

## रेल्वेच्या धडकेत ३४ वर्षीय युवकाचा मृत्यू



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या बोरुजवाडा पुलाखाली आज पहाटे सुमारे ४ वाजताच्या सुमारास रेल्वेची धडक होऊन ३४ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. मृतकाचे नाव दिनेश जानबाजी अडमाची (वय ३४, रा. यशवंत बाबा नगर, सावनेर) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरहून झाशीच्या दिशेने जाणाऱ्या मालगाडीची धडक बसल्याने दिनेश अडमाची यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती सावनेर पोलीस निरीक्षक ऋतुजा जाधव यांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना दिली.

माहिती मिळताच हितज्योती आधार फाउंडेशनच्या टीमने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून सावनेर येथील शासकीय रुग्णालयात आणण्यात आला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.दरम्यान, सावनेर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रवाना केला असून पुढील तपास सुरू आहे. या कार्यवाहीदरम्यान सावनेर पोलीस कर्मचारी कापोल तभाने, गणेश राय तसेच हितज्योती आधार फाउंडेशनचे टीम सदस्य अभिषेक कोठाडे, अण्णा सिंदेवार यांनी मदत केली.

## तरुणाईला वाचवा, व्यसनमुक्त समाज घडवा, श्री लक्ष्मणराव मानकर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये नशामुक्ती अभियान

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

भवभूती शिक्षण संस्थेद्वारा संचालित श्री लक्ष्मणराव मानकर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे नशामुक्त भारत अभियानांतर्गत बी. फार्म. व डी. फार्म. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सार्वजनिक नशामुक्ती प्रतिज्ञा घेतली. तरुणाईला व्यसनाच्या विळख्यातून दूर ठेवून निरोगी व जबाबदार समाज निर्माण करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

नशामुक्त भारत अभियान ही भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणारी महत्त्वपूर्ण राष्ट्रीय मोहीम आहे. अमली पदार्थांच्या व्यसनापासून देशातील तरुणांना दूर ठेवणे, व्यसनाच्या




दुष्परिणामांबाबत जनजागृती करणे आणि निरोगी जीवनशैलीसाठी तरुणांना प्रेरित करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

ब्रह्मकुमारी मेडिकल विंग, आमगाव यांच्या वतीने दादी प्रकाशमणि यांच्या पावन स्मृतीनिमित्त या महाअभियानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला ब्रह्मकुमारी मेडिकल विंगच्या वैशाली दीदी, लक्ष्मी दीदी व उमेश भाई तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुलसीदास निंबेकर आणि प्रा. महेंद्र तिवारी उपस्थित होते.

यावेळी वैशाली दीदी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, नशामुक्ती अभियानाचा उद्देश केवळ व्यसनाविरोधात जनजागृती करणे एवढाच नसून तरुणांना निरोगी, सकारात्मक आणि जबाबदार जीवन जगण्यासाठी प्रेरित करणे हा आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः व्यसनांपासून दूर राहून समाजातही नशामुक्तीचा संदेश पोहोचवावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरेंद्र कावळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन महेंद्र तिवारी यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी नशामुक्तीची शपथ घेत समाजात जनजागृती करण्याचा संकल्प केला.

तरुणांनी व्यसनमुक्त जीवनाचा स्वीकार करून समाजाच्या निरोगी भवितव्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन संस्थेचे सचिव केशवराव मानकर आणि तांत्रिक सल्लागार डॉ. डी. के. संघी यांनी केले.

## झाड पडलेल्या ठिकाणी वृक्षारोपण

### नगरसेवकांसह कळमना अग्निशमन केंद्राचा पर्यावरणपूरक उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कळमना अग्निशमन केंद्राच्या कार्यक्षेत्रातील मिनीमाता नगर परिसरात झाड पडलेल्या ठिकाणी नवीन वृक्षाची लागवड करण्यात आली. झाड पडल्याने निर्माण झालेली अडचण दूर करण्यासोबतच त्याच ठिकाणी नवीन वृक्ष लावून पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेश देण्यात आला. दि. २८ जुलै २०२६ रोजी न्यू आदर्श मोबाईल सेंटरजवळ, मिनीमाता नगर, नागपूर येथे झाड पडल्याचा कॉल कळमना अग्निशमन केंद्राला प्राप्त झाला होता. माहिती मिळताच अग्निशमन विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पडलेल्या झाडामुळे परिसरातील नागरिकांची तसेच वाहतुकीची गैरसोय होऊ नये, यासाठी अग्निशमन कर्मचाऱ्यांनी तत्काळ कार्यवाही करत रस्त्यावर पडलेले झाड कापून बाजूला केले होते. त्यामुळे परिसरातील वाहतूक सुरळीत करण्यात आली होती. दरम्यान, ह्यएक झाड गेले, तर त्याच्या जागी नवीन झाड उभे करणेह्न या पर्यावरणपूरक भावनेतून आज, दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी याच ठिकाणी नवीन वृक्षाची लागवड करण्यात आली. झाड पडलेल्या जागेवरच नवीन वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.